शनिवार
३१ जानेवारी १९८१

# माणूस

किंमत
एक रुपया

" १९७७ मध्ये आणीबाणी संपून काही महिने उलटल्यावर (लगेच नाही) प्रा. देवनाथन् यांनी माझ्याविरुद्ध तक्रार केली की, ' सुरेश पेंडसे व त्यांच्या इतर मदतनिसांनी मिळून मला अटकेत असताना जबरदस्त मारहाण केली. कारण मी नक्षलवादी आहे, घातपाती आहे म्हणून '....

प्रा. देवनाथन्, त्यांच्या पत्नी, त्यांचे इतर नातेवाईक
हे समाजातील वरिष्ठ थरातील उच्चपदस्थ असल्यामुळे
या तक्रारीचा खूप गवगवा झाला.
सारे आरोप निखालस खोटे असल्याचे चौकशीअंती सिद्ध झाले."

सुरेश पेंडसे यांची खास मुलाखत...पृष्ठ १२

## पी. एम्. टी. ची भरमसाठ भाडेवाढ
## रोज ३०-३५ हजारांची लूट

पृष्ठ २

# सप्रेम नमस्कार…

¤ भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीने पक्षाचा म्हणून एक आर्थिक कार्यक्रम निश्चित केला आहे. या कार्यक्रमाला त्यांनी 'गाधीवादी समाजवाद' असा शब्दप्रयोग वापरला आहे. पक्षाच्या पहिल्याच राष्ट्रीय अधिवेशनात या शब्दप्रयोगावरून वाद उत्पन्न झाला. पक्षाच्या कार्यकर्त्यांचा या आर्थिक कार्यक्रमाला विरोध नव्हता तर त्या कार्यक्रमाला 'गांधीवादी समाजवाद' असे जे नाव दिले आहे त्या शब्दप्रयोगालाच फक्त कार्यकर्त्यांचा विरोध दिसला.

खरे तर, आज 'समाजवाद', 'समाजवादी' हे शब्द म्हणजे गुळगुळीत नाणी झाली आहेत. अर्थहीन शब्द झाले आहेत. जगातल्या अनेक पुढाऱ्यांनी 'समाजवाद' हा शब्द आपल्या कर्तृत्वाने नासवून टाकला आहे. या देशातील समाजवाद्यांनी तर हा शब्द आपल्या वागण्याने हास्यास्पदच करून ठेवला आहे. आज सुशिक्षित भारतीयांच्या जीवनात तर हा शब्द चेष्टेचा, हेटाळणीचा झाला आहे आणि खेड्यापाड्यातील भावुक-भारतीय मनाला हा शब्द कधी 'अपील'च होऊ शकला नाही. त्यामुळे त्याला या शब्दाबद्दल आस्था नाही. गेल्या ३०–४० वर्षांत अनेक राजकीय पक्षानी हा शब्दप्रयोग वापरला म्हणून ग्रामीण भागात त्यांना काही विशेष स्थान मिळाले असे नाही. 'गाधीवादी समाजवाद' हा शब्दप्रयोग स्वीकारताना 'भाजप'च्या नेत्याच्या हाताला सामान्य माणसाची नाडी लक्षातच आली नाही असे म्हणावे लागेल!

गांधीवाद (खरे तर, गांधीनी माडलेले विचारच. कारण गांधीजीनी कुठलाही 'वाद' मांडला नव्हता) आणि समाजवाद यांचा ज्यांनी अभ्यास केला आहे त्यांना हे ठाऊक आहे, की या दोन्ही विचारप्रणालीमध्ये खूप भिन्नता आहे. दोघाचा एकमेकाशी तसा काहीही संबंध नाही. आणि गाधीजीनी तरी कोठे 'गाधीवाद' किंवा 'समाजवाद' हे शब्द वापरले होते? या खऱ्याखुऱ्या लोक नेत्याने लोकांच्या चळवळी उभारताना, त्याच्यापुढे कार्यक्रम ठेवताना कुठलेही पुस्तकी शब्द वापरले नाहीत; तर सामान्य माणसाच्या चटकन् ध्यानात येतील, खेड्यापाड्यातील भावुक भारतीय मनाला चटकन् 'अपील' होतील असेच शब्दप्रयोग त्यांनी वारंवार केले. त्यामुळेच ते जनआदोलने उभी करू शकले. आपल्या आर्थिक–सामाजिक विचाराला त्यांनी असेच सामान्य शेबड्या पोरालाही कळेल असे नाव दिले ते म्हणजे 'रामराज्य'. परंतु 'भाजप'च्या नेत्यांनी 'गांधीवादी समाजवाद' हा जो शब्दप्रयोग वापरला त्यावरून असे वाटते की या नेत्यांना अजून भारतीय मातीचा वास लागायचा आहे!

भाजपच्या नेत्यांनी हा शब्दप्रयोग स्वीकारण्याची प्रामुख्याने दोन कारणे वाटतात. एक म्हणजे पूर्वाश्रमीच्या जनसंघाची 'आर्थिक विचाराबाबत मागासलेपणा'ची प्रतिमा पुसण्यासाठी. दुसरे कारण म्हणजे 'रामराज्य' सारखे खरेखुरे भारतीय शब्द वापरले तर अल्पसंख्याक दूर जातील, या भीतीने. म्हणजे या शब्दप्रयोगाचा आग्रह धरताना भाजपच्या नेत्यांनी पुरोगामी प्रतिगामी या शब्दाचा खेळ करणाऱ्या मूठभर टीकाकारांचाच फक्त विचार केलेला दिसतो. सामान्य माणसाच्या विचाराचे प्रतिबिंब यात दिसत नाही, ही मोठी खेदाची गोष्ट आहे.

आणि खरे सांगायचे तर, या देशातील राजकारण्यांनी शब्दाच्या व मोठमोठ्या घोषवाक्यांच्या आधारे अनेक कोलांटउड्या मारल्या आहेत, गर्जना केल्या आहेत. पण हे सारे कृतीचे शत्रू निघाले. त्यामुळे सामान्य भारतीयाचा या शब्दावरचा विश्वासच उडाला आहे. भले तुम्ही कितीही चागले शब्द वापरा! आज या देशातील सामान्य भारतीय भुकेलेला आहे तो राजकारण्यांच्या स्वच्छ, नीतिमान, चारित्र्यसंपन्न, जनहित-कळकळीच्या व्यवहाराचा. शब्दाच्या आतषबाजीचा किंवा घोषणाच्या फुलोऱ्याचा नव्हे.

मग भारतीय मातीशी नाते सांगणारे शब्दप्रयोग वापरू नये?

२४ जानेवारी ८१ छाया सोनवणे, देवपूर


## साप्ताहिक माणूस

वर्ष : विसावे

अंक : पस्तिसावा

३१ जानेवारी १९८१

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

पुणे वार्ता

# तीन प्रमुख दैनिकांचे महोत्सव

वीस जानेवारी. पुण्यातलं सरस्वतीमंदिराचं पटांगण. आज या ठिकाणी पुण्यातल्या दैनिक 'तरुण भारत'चं रौप्यमहोत्सवी वर्ष सुरू झाल्याबद्दल खास समारंभ आयोजित, करण्यात आला होता. समारंभाचे मुख्य पाहुणे होते प्रा. शिवाजीराव भोसले.

पटांगणाच्या प्रवेशद्वाराशी दोन्ही बाजूना 'तरुण भारत'शी जवळून संबंध असलेली मंडळी स्वागतासाठी उभी होती. थोडं पुढं गेलं की 'तरुण भारत'च्या खडतर तपश्चर्येची वाटचाल शब्दांकित करणारी पत्रिका आणि तिळगूळ-पेढा दिला जात होता. कमानीखालून जात असताना वरून गुलाब-पाणी शिंपडण्याचीही सोय केलेली होती.

मैदानात दोन्ही बाजूना खुर्च्या आणि मधल्या भागात भारतीय बैठक अशी रचना होती. सहा वाजेपर्यंत सर्व खुर्च्या भरल्या होत्या आणि भारतीय बैठकही व्यापण्यास सुरुवात झाली होती. समारंभ सुरू झाला.

राष्ट्रीय विचार प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वि. रा करंदीकर यांनी उपस्थिताचे स्वागत केल्यावर रौप्यमहोत्सव समितीचे चिटणीस वसंतराव गीत यानी निरनिराळ्या प्रतिष्ठित व्यक्तीकडून आलेले संदेश वाचून दाखवले. त्यानंतर मंडळाचे संचालक दादासाहेब ठकार यानी व्यासपीठावरील मान्यवर व्यक्तींचा सन्मान केला. रौप्यमहोत्सव समितीच्या अध्यक्षा सुमित्राराजे भोसले यांनी आपल्या भाषणात 'भारतीय संस्कृतीचा वारसा जपणारे जनसंपर्काचे माध्यम' अशा शब्दात 'तरुण भारत'चा गौरव केला, तर नागपूरच्या 'तरुण भारत'चे संपादक मा. गो. ऊर्फ बाबुराव वैद्य यानी आपल्या भाषणात लोकाश्रय, राजाश्रय, प्रतिष्ठा आणि लोकप्रियता यापैकी कशाच्याही मागे न लागता योग्य वाटणारा विचार समाजाच्या गळी उतरविण्याचा आमचा प्रयत्न आहे, असे सांगितले.

यानंतर समारंभाचे प्रमुख पाहुणे प्रा. शिवाजीराव भोसले यांचं भाषण सुरू झालं. त्यांच्या भाषणात नेहमीचा शब्दांचा फुलोरा होताच. त्यामुळे मुद्द्याचं फारसं काही न सांगतादेखील त्यानी श्रोत्यांना खिळवून ठेवलं. जोडीला अधूनमधून 'जे चांगलं असेल त्याला जो चांगलं म्हणतो तो चांगला' यासारख्या सुविचारवजा शाब्दिक कसरतीही चालू होत्याच त्यामुळेच शिवाजीराव बातमीदारांची फार अडचण करून ठेवतात. कितीही धडपडलं तरी 'लीड' मिळत नाही आणि मिळालाच तर जोडून घेता येईल असा एखादा पुढला 'पॅरा' मिळत नाही. दारूकामाची आतषबाजी पहावी; पण ती संपली की पुन्हा डोळ्यासमोर अंधार— शिवाजीरावाचं भाषण तसं असतं.

¤

यंदाच्या जानेवारी महिन्याचं वैशिष्टयच असं आहे की या महिन्यात पुण्यातली तीन प्रमुख वृत्तपत्रं आपली महोत्सवी वर्षं साजरी करत आहेत 'केसरी'च्या शताब्दीची ४ जानेवारी आणि १४ जानेवारी अशा दोन दिवशी धूमधडाक्यात सांगता झाली. एक जानेवारीला 'सकाळ'ने सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण केलं तर आज 'तरुण भारत' रौप्यमहोत्सवी वर्षाला सुरुवात करत होतं. सुमित्राराजे भोसले यांनी आपल्या भाषणात या योगायोगाचा आवर्जून उल्लेख केला.

'केसरी'च्या चार जानेवारीच्या कार्यक्रमाचा वृत्तांत 'माणूस'च्या अंकातून दिला होताच. १४ जानेवारीचा कार्यक्रम दिसायला भव्य-दिव्य होता, पण आतून मात्र अगदी पोकळ. पंतप्रधान इंदिरा गांधी या समारंभाच्या प्रमुख पाहुण्या असल्यामुळे संपूर्ण समारंभाचं 'सरकारीकरण' झालं होतं. इथे जाऊ नका, तिथे पाहू नका, इकडे बसू नका, तिकडून घुसू नका—पोलीस—एल. आय. बी.ची माणसं मागेच लागली होती. कुठे मोकळेपणा म्हणून नाही! शिवाय पंतप्रधानाच्या हस्ते दोन-चार प्रकाशनं सात-आठ-दहा सत्कार, अपंगांना सहाय्य असले वेळ खाणारे आणि काहीही हाती न लागणारे (पाहुणाऱ्याना) कार्यक्रम होतेच. व्यवस्था आणि सजावटीत कुठलीही उणीव नसताना इतका कंटाळवाणा कार्यक्रम गेल्या अनेक वर्षांत पाहिला नव्हता!

यावरून सहज आठवण झाली. 'केसरी'च्या या शताब्दी वर्षानिमित्त नुकताच टी. व्ही.वर एक कार्यक्रम सादर झाला 'केसरी'ची गेल्या शंभर वर्षांतील वाटचाल या कार्यक्रमात चित्रित केली आहे, असा निवेदकाचा दावा होता, पण प्रत्यक्षात १९६५ साल गेलं. —भारत—पाकिस्तान युद्ध झालं—लालबहाद्दुर शास्त्रींच्या निधनाचं वृत्त देणारा 'केसरी'चा अंक टी. व्ही.च्या पडद्यावर आला आणि पुढच्याच क्षणी पुन्हा भा. द. खेर, मधुकर कुलकर्णी आणि त्याचा नातू पडद्यावर—'तर अशी आहे बरं 'केसरी'ची शंभर वर्षांची वाटचाल!' असं म्हणत कार्यक्रम संपला!

१९६५ नंतरच्या पंधरा वर्षांचं काय झालं? तो भाग आयत्या वेळी कापून टाकण्यात आला की लोकमान्यांच्या 'केसरी'ची वाटचाल म्हटल्यावर इथेच थांबलं पाहिजे, असा सुज्ञपणा संबंधितांनी दाखवला? कार्य असेल ते असो; एकूण प्रकार गंमतशीर झाला खरा!

¤

एक जानेवारीला 'सकाळ'च्या सुवर्णमहोत्सवी वर्षाची सुरुवात. इमारतीवर उत्कृष्ट विद्युतरोषणाई केलेली होती. चौथ्या मजल्यावरच्या हॉलमध्ये स्वागत-समारंभ आयोजित केला होता. निरनिराळ्या क्षेत्रातली असंख्य प्रतिष्ठित मंडळी येत होती, परस्परांशी, 'सकाळ'च्या संचालक मंडळाशी, संपादकीय विभागातल्या लोकांशी गप्पा मारत होती. हॉलभर हास्य-विनोदाचे फवारे उडत होते. तीन-साडेतीन तास अव्याहतपणे हे वातावरण पसरलेलं होतं. कोणताही औपचारिक कार्यक्रम नाही. भाषणबाजी नाही, सत्कार-समारंभ नाही. पुण्यातल्या विविध क्षेत्रातल्या हजारो मंडळींचं ते एक स्नेहसंमेलन होतं. अतिशय दिलखुलास! सर्वांना एकाच सूत्रानं तिथे खेचून आणलं होतं—'सकाळ'बद्दलच्या हार्दिक सदिच्छा!

¤

पुण्याच्या सामाजिक जीवनाचा अविभाज्य अंग बनून गेलेली ही तीन वर्तमानपत्रं. 'बातमी' हा वर्तमानपत्राचा केंद्रबिंदू मानून शक्य तितक्या तटस्थपणानं चालवला जाणारा 'सकाळ', इंदिरा कांग्रेस व मार्क्सवाद यांच्या खेचाखेचीमध्ये गोते खात असलेला 'केसरी' आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ–जनसंघ–भारतीय जनता पक्ष यांच्या विचाराशी साम्य दाखवणारा, तरीही तटस्थ समालोचनाचा प्रयत्न करणारा 'तरुण भारत' या तिन्ही वृत्तपत्रांचा आपापला खास वाचकवर्ग आहे. गेल्या पंचवीस-पन्नास-शंभर वर्षांच्या परंपरेतून जोडला गेलेला. ¤

याच संदर्भात आणखी एक मुद्दा मांडावासा वाटतो. अशा तऱ्हेच्या सामाजिक संस्थांचे महोत्सवी समारंभ कसे व्हावेत, याविषयी नेहमीच चर्चा चालू असते; पण एकाच महिन्यात तीन वृत्तपत्रांचे समारंभ पाहिल्यावर मात्र असं राहून राहून वाटायला लागलं आहे की आता या प्रास्ताविक, संदेशवाचन, सत्कार, भाषणबाजी, आभार अशा प्रकारांना पूर्ण फाटा दिला पाहिजे. कारण त्यामुळ होतं असं की, एका चांगल्या निमित्तानं हजारो लोक एकत्र येत असूनही कुणी कुणाशी धड बोलूसुद्धा शकत नाही. जो तो आपापल्या खुर्चीत व्यासपीठाकडे पहात बसलेला. दोन-अडीच तासांनी कंटाळून घराकडे चालू लागणार! निरनिराळ्या क्षेत्रातली इतकी चागली माणसं या निमित्तानं एकत्र येतात आणि तशीच निघून जातात. पुन्हा संबंधित वृत्तपत्राचे किंवा संस्थेचे पदाधिकारीही व्यासपीठावर. सबंध कार्यक्रम व्यवस्थित कसा होईल, या विवंचनेत. त्यांच्याशी कोणी गप्पा मारू शकत नाही, तेही व्यासपीठावरून खाली येऊ शकत नाहीत.

तेव्हा या सर्व बाबींचा विचार केला पाहिजे. महोत्सवाचा दिवस हा रटाळ भाषणबाजीला वाहून न टाकता दिलखुलास स्नेहसंमेलनासाठी राखून ठेवला पाहिजे. ¤

## पी. एम्. टी. भाडेवाढ

डिझेलच्या दरवाढीमुळे प्रवासी-वाहतुकीचे दर १० ते १५ टक्के वाढणे अपेक्षितच आहे; पण या दरवाढीचा फायदा घेऊन सरकारने २५ टक्के दरवाढ केली तर पी. एम. टी. ने ६० ते १०० टक्के भाडेवाढ केली. आहे ही भाडेवाढ सामान्य माणसाला न परवडणारी आहेच; पण वाहतूक महागल्यामुळे वाहतुकीस महत्त्व असलेल्या भाजीपाला यासारख्या वस्तू महागतात, त्यामुळे सामान्य कुटुंबाचे जीवन दरमहा ५० ते१०० रुपयांनी महागले आहे.

बसचे भाडे वाढणे हे काही फारसे अनपेक्षित नाही. पण डिझेल व गाड्यांचे सुटे भाग यांच्या वाढत्या किंमतीच्या गणितातच ही वाढ अपेक्षित आहे.

या सगळ्याचा विचार करून राज्य सरकारने २५ टक्के भाडेवाढीचे गणित केले, पण राज्य सरकारने गणितश्रेणीने भाडेवाढ केली आणि पी. एम. टी. ने मात्र भूमितीश्रेणीने भाडेवाढ केली. ही भाडेवाढ म्हणजे पूर्णपणे फसवेगिरी आहे. सरकारचे सदोष नोटिफिकेशन, दोन किलोमीटरचा स्टेज धरण्याचा आग्रह व ७० पैशाच्यापुढे ५ पैसे राज्य सरकारचा सेस गोळा करण्याबाबतचे चुकीचे निर्णय हे याला कारण आहे.

किमान भाडे ४० पैसे आहे यापासूनच या फसवेगिरीला सुरुवात झाली आहे. राज्य सरकारने २५ ते ४० पैसे एवढे किमान भाडे आकारण्यास परवानगी दिली आहे. राज्यात कोणत्याही परिवहनसंघटनेने ४० पैसे भाडे केलेले नाही. हे भाडे किमान ३० पैसे किंवा ३५ पैसे चालू शकले असते; पण हा मुद्दाही गौण आहे. या नोटिफिकेशनमध्ये किमान भाडे व पहिल्या दोन किलोमीटरचे भाडे यातला फरक निश्चित केलेला नाही. किमान भाडे व २ कि. मी. चे भाडे यातील किचकट फरक कोणी शोधत बसत नाही. त्याचा परिणाम असा होतो आहे की, प्रत्येक तिकिटामागे २५ पैसे जास्त घेतले जाऊन दररोज पी. एम. टी. च्या तिजोरीत २५ हजार रुपयांची भर पडत आहे.

गेल्या वेळी जाहीर झालेल्या नोटिफिकेशनमध्ये पहिल्या दोन किलोमीटरला प्रत्येकी साडेसात पैसे व नंतरच्या प्रत्येक किलोमीटरला ६ पैसे असा दर होता व किमान दर २५ पैसे होता.

पहिल्या दोन किलोमीटरला १५ पैसे हा अधिकृत दर असून सुद्धा २५ पैसे घेतले जात असत; पण दुसऱ्या स्टेजनंतरही त्यात विशेष वाढ होत नसे. किमान दर हा आवश्यक असल्यामुळे या प्रकारात नेमकी काय 'गोची' आहे हे लक्षात येत नाही; पण १० किलोमीटर अंतर घेतले तर पूर्वी जेथे ६५ पैसे पडत तेथे आता १०५ पैसे पडतात. शासकीय वाढीनुसार ते ७५ किंवा ८० पैसे अपेक्षित आहेत. आता पुढील जी २५ पैसे वाढ आहे ती पहिल्या दोन किलोमीटरचा दर निश्चित न झाल्यामुळे. पहिल्या दोन कि. मी. ला सरकारने प्रत्येकी १० पैसे दिले तरी पहिल्या दोन कि. मी. ला २० पैसे पडतील. किमान ४० पैसे भाड्यात ते लक्षात येणार नाही; पण आज दुसरा स्टेज सुरू झाल्यावर ५५ पैसें व तिसरा स्टेज सुरू झाल्यावर ७५ पैसे घेतले जातात तेथे दुसऱ्याही स्टेजला ४० पैसे व तिसऱ्या स्टेजला५०पैसे द्यावे लागतील. सध्या किमान भाडे पहिल्या स्टेजला द्यावे लागते व दुसऱ्या स्टेजला त्यात स्वतंत्रपणे१५ पैसे मिसळले जातात. याचा परिणाम असा होतो की शहरात जे दररोज दीड लाख प्रवासी प्रवास करतात, त्या प्रत्येकाकडून २५ पैसे जास्त घेतले जातात. ही ३०–३५ हजार रुपयांची लूट पी.एम.टी करीत असते.

पूर्वी १ किलो मीटरचा स्टेज होता. आता दोन किलोमीटरचे एकत्रित भाडे आकारून वाढ केल्यामुळे ३, ५, ७, ९ अशा कि. मी. अतरावर जाणाऱ्याचे साडेसात पैसे वाया

जातात. त्यातील ५ पैसे निश्चितच वाचतील.'

७० पैसे भाड्यानंतर राज्यसरकारचा ५ पैसे 'सेस' हा एक झिजियाकर आहे. दुष्काळासाठी बसविलेला हा कर हे ना ते कारण काढून कायम केला आहे. पूर्वी ७० पैसे भाडे हे १२ कि. मी. नंतर सुरू होत असे. आता सव्वाचार कि. मी. नंतरच ७० पैसे पडतात. ४ ते १२ कि. मी. या दरम्यान अंतरावर प्रवास करणारांची संख्या ७०टक्के आहे. त्यामुळे या लोकांकडून दररोज सुमारे ५ हजार रुपये वसूल होत असतात.

सरकारने अधिकृत दिलेली भाडेवाढ मान्य केली तरीही त्या नोटिफिकेशनमधील त्रुटी व अमलबजावणीतील हेके दूर केले तर पुण्याच्या लोकजीवनाला लागलेल्या ५० हजार रुपये भूर्दंडाच्या जळवा कमी होतील.

—प्रतिनिधी

# ओलिसांची मुक्तता

## एक तणाव संपला !

वा. दा. रानडे

इराणने ४४४ दिवस अडकवून ठेवलेल्या ५२ अमेरिकन ओलिसाची अखेर अमेरिकेचे अध्यक्ष रोनाल्ड रेगन यांच्या अधिकारग्रहणाच्या दिवशी वीस जानेवारीला मुक्तता झाली. या प्रश्नासंबंधी मावळते अध्यक्ष जिमी कार्टर यांनी इराणशी केलेल्या करारात कोण जिंकले ? कोण हरले ? की दोघाचाही विजय झाला ?

इराणसारख्या एका छोटया राष्ट्राने अमेरिकेसारख्या जगातील सर्वात बलाढ्य राष्ट्राचे ५२ नागरिक ४४४ दिवस अडकवून ठेवावेत आणि अमेरिकेला, संयुक्त राष्ट्रसंघटनेला या बाबतीत काही करता येऊ नये ही या प्रकरणात जाणवलेली सर्वात महत्वाची गोष्ट. एका देशाचे नागरिक असे ओलीस ठेवणे हा मानवी हक्कांचा, आंतरराष्ट्रीय कायद्याचा व संकेताचा भंग नाही काय ? पण त्याबाबतीत अमेरिका व इतर जग काय करू शकले ? अमेरिकेने इराणच्या शहांना ते पदच्युत झाल्यानंतर आसरा दिला हे या संघर्षाचे मूळ कारण. शहाना आमच्या ताब्यात द्या, त्यांची मालमत्ता परत करा ही शहाना पदच्युत करून अधिकारावर आलेल्या खोमेनी राजवटीची मुख्य मागणी होती. शहांनी नंतर इजिप्तमध्ये आसरा घेतला व तेथेच ते २७ जुलै १९८० ला निधन पावले. संघर्षाचे मुख्य कारण संपले. आता तरी इराण ओलिसांची मुक्तता करील अशी अपेक्षा त्या वेळी व्यक्त करण्यात येत होती; पण आपल्या मागण्या मान्य झाल्याशिवाय ओलीस सोडावयाचे नाहीत अशी ठाम भूमिका इराणने घेतली.

खोमेनी यांनी १२ सप्टेंबर १९८० ला ओलिसाना सोडण्यासाठी आपल्या चार अटी जाहीर केल्या. १. शहाची संपत्ती इराणला परत करण्यात आली पाहिजे. २. इराणच्या राजकीय व लष्करी प्रश्नात कोणताही हस्तक्षेप आम्ही करणार नाही अशी हमी अमेरिकेने दिली पाहिजे. ३. अमेरिकेने गोठविलेली इराणची मालमत्ता परत केली पाहिजे. ४. इराणविरुद्धचे दावे अमेरिकेने काढून घेतले पाहिजेत. इराणच्या पार्लमेंटने या अटींना मान्यता दिली.

वाटाघाटी करून आपल्याला अनुकूल अटींवर हा प्रश्न सोडवावा असे इराणचे पंतप्रधान महमूद अली राजाई यानाही वाटत होते. दरम्यान इराकने इराणवर आक्रमण केले. या आक्रमणाबद्दल आपला निषेध व्यक्त करण्यासाठी राजाई ऑक्टोबर १९८० चे मध्यास अमेरिकेस गेले; पण ते निमित्त होते. त्याच भेटीत त्यांनी ओलिसांच्या प्रश्नावर बोलणी करून खोमेनीच्या अटींवर अमेरिकेची भूमिका काय आहे हे अजमावले. अमेरिका बोलणी करायला तयार आहे हे त्यांना दिसून आले. अल्जेरियाचे मध्यस्थीने ही बोलणी झाली.

मुख्य प्रश्न होता ओलिसांच्या मुक्ततेच्या मोबदल्यात अमेरिकेने इराणला द्यावयाची रक्कम निश्चित कशी ठरवायची ? सुरुवातीच्या एका अंदाजाप्रमाणे ही रक्कम ५६ अब्ज डॉलर होती; पण नंतरच्या अधिक वस्तुनिष्ठ अंदाजाप्रमाणे अमेरिकेने गोठवलेली इराणची संपत्ती १४ अब्ज डॉलर होती व त्याशिवाय शहांची जिंदगी १० अब्ज डॉलर होती. हे २४ अब्ज डॉलर आपल्याला मिळायला हवेत अशी इराणची मागणी होती. अमेरिकेने इराणला ८ अब्ज डॉलर देण्याचे मान्य केले. शहाची जिंदगी त्यांच्या व त्यांच्या कुटुंबाच्या वैयक्तिक मालकीची असल्याने ती अमेरिका परत करू शकत नाही असा अमेरिकेचा मुद्दा; पण त्यात एक सवलत सूचित केलेली होती. इराणने शहाच्या मालमत्तेचे राष्ट्रीयीकरण केले तर ती इराणला देण्याच्याबाबतीत विचार करता येईल. अखेर झालेल्या कराराप्रमाणे अमेरिकेने शहांची मालमत्ता गोठविली आहे; पण ती इराणला परत केलेली नाही.

इराणच्या अंतर्गत कारभारात अमेरिका प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हस्तक्षेप करणार नाही असे अभिवचन अमेरिकेने दिले आहे. इराणविरुद्ध केलेली न्यायालयीन कारवाई मागे घेण्यात यावी ही खोमेनीची अटही मान्य करण्यात आली आहे. शहाची मालमत्ता इराणला परत मिळाली नसली तरी या मालमत्तेचे ५८ इराणियन व ५ अमेरिकन

मालक कोण आहेत याची माहिती इराणला मिळवून देण्याच्या कामी अमेरिकेने मदत केली. इराणियन मालकांपैकी बहुतेक शहांचे नातलगच आहेत. इराणने या सर्वांविरुद्ध न्यूयॉर्कमध्ये दावे लावले आहेत.

इराणची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट आहे. गेल्या ऑक्टोबरमध्ये अध्यक्ष बानीसद यांनी खोमेनींना एक पत्र लिहून या परिस्थितीकडे लक्ष वेधले होते. त्यात त्यांनी म्हटले होते, ' सरकारजवळ एक रियालसुद्धा शिल्लक नाही. सेंट्रल बँकेकडून सरकार कर्ज काढते व खर्च करते. इराणचे काय होणार आहे ?' ओलिसांच्या मुक्ततेचे मोबदल्यात अमेरिकेकडून जास्तीत जास्त रक्कम पदरात पाडून घेण्याचा इराणने प्रयत्न केला. करार करण्यास हीच वेळ योग्य आहे. कार्टर अधिकारावर असेपर्यंतच तो करावा. ओलिसाचा प्रश्न आणखी ताणण्यात अर्थ नाही, रेगन अधिकारावर आल्यानंतर त्यांनी अधिक कडक उपाय योजावयाचे ठरविले तर प्रश्न आणखी बिकट होईल, असा विचार करून इराणने हा करार केला असावा असे दिसते.

अमेरिकन ओलिसांना सुरक्षित परत कसे आणावयाचे हा अमेरिकेपुढे मुख्य प्रश्न होता. त्यांना मुक्त करण्याची एक योजना कार्टर यांनी आखली होती; पण ती अयशस्वी झाली. अमेरिका पुन: असे काही करण्याचा संभव आहे ही धास्ती इराणला होतीच. तर या प्रश्नावर प्रक्षोभ वाढून ओलिसांच्या जिवाला धोका पोचणार नाही ना ही अमेरिकेला भीती वाटत होती. असे काही अतिरेकी व आततायी कृत्य आपण केले तर त्याचे फार गंभीर परिणाम होतील याची इराणलाही कल्पना होती. म्हणून दोन्ही बाजूंनी संयम पाळला व वाटाघाटींनीच हा प्रश्न सोडविला.

या करारात अमेरिकेला काही गमवावे लागलेले नाही. इराणची गोठविलेली मालमत्ताच अमेरिकेने परत केली, खंडणी म्हणून तिला स्वतःच्या पदरची काही रक्कम द्यावी लागलेली नाही. ओलीस सुरक्षित परत मिळविणे हा मुख्य उद्देश साध्य झाला. इराणमधील वास्तव्यात ओलिसांचा शारीरिक व मानसिक छळ करण्यात आला, त्यांचा काहींच्या मनावर परिणाम झाला असल्याच्या बातम्या आहेत. या बातम्या समजल्यावर इराणबद्दल अमेरिकनांना पुन: संताप वाटणे स्वाभाविक आहे पण त्याची प्रतिक्रिया म्हणून अमेरिका झालेला करार रद्द करील काय ? ओलीस आता परत मिळालेच आहेत. करार रद्द केला तरी इराण काय करू शकते ? असे काही घडण्याचा संभव इराणनेही गृहीत धरलेला होता. म्हणून इराणला द्यावयाची रक्कम अल्जीरियातील बँकेत ठेवण्याची अट इराणने घातली. कबूल केलेली रक्कम ठेवल्याचे समजल्यानंतरच ओलिसांची मुक्तता केली. पूर्वीच्या सरकारने केलेले करार नव्या सरकारने पुढे चालू ठेवावयाचे हा सर्वमान्य आंतरराष्ट्रीय संकेत आहे. अमेरिका तो मोडील असे वाटत नाही. कराराचा आम्ही सखोल अभ्यास करीत आहोत असे नव्या रेगन राजवटीचे निवेदकाने सांगितले. कराराचा फेरविचार किंवा त्यात काही बदल होऊ शकणार नाहीत असा त्याचा अर्थ नाही; पण ते उभय देशाचे संमतीने झाले पाहिजे. अमेरिकेला करार एकतर्फी रद्द करता येणार नाही.

या घटनेनंतर आता अमेरिका व इराणचे संबंध काय राहतील ? कराराचा संपूर्ण तपशील प्रसिद्ध झालेला नाही; पण अमेरिकेने इराणला शस्त्राचे सुटे भाग देण्याचे मान्य केले आहे, अशी एक बातमी होती. इराणला ही मदत हवीच आहे; पण त्यापलीकडे जाऊन इराणला शस्त्राची मदत अमेरिका सुरू करील काय ? अशी मदत सुरू केल्याने या भागात शस्त्रस्पर्धा, तणाव, व ' संघर्ष ' वाढतील तेव्हा या बाबतीत अमेरिकेला विचारपूर्वक निर्णय घ्यावा लागेल. □


**नवीन दाखल झालेली पुस्तके**

१. काही भारतीय क्रिकेटपटू–रुसी मोदी
२. योगप्रवेश–विश्वास मंडलीक — रु. १६/–
३. लाखातील एक–( विनोदी कथा )–बाळ गाडगीळ — ,, १५/–
४. माहिष्मती–(अहिल्याबाई होळकराचे जीवनावर कादंबरी) नयनतारा देसाई — ,, ४०/–
५. बायकोला मारणारा नवरा–(विनोदी कथा) अनुराधा औरंगाबादकर — ,, १२/–

1. Breakthrougs–(Astorishing adranees in medicine & science)–Charles Panati — £ 1.28
2. My Story–( Autobiography )–Jony Greig — Rs. 136/–
3. Living for Cricket–(Cricket)–Clive Lloyd — ,, 60/–
4. Karma Cola–( an exercise in language twisting )–Gita Mehta — ,, 15/–
5. Delta of Venus–(Erotic)–Anal's Nin
6. A Spell from Laker–( Cricket )–Jim Laker — ,, 107/–

*The best way*
मख्ख तोडाने पुस्तकात डोळे खुपसून
' महागाईचा भस्मासुर विसरा '
हॉटेल, सिनेमा, स्कुटर-मोटारी बंद ठेवा !!

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव, पुणे ३०**

# अप्पा–एका तळेगावकराच्या दृष्टीतून

सुहास ना. नाखरे

प्रख्यात साहित्यिक गो. नी. दाडेकर ऊर्फ अप्पा दांडेकर हे आमचे. आमच्या घरचे. अप्पा अकोला साहित्य समेलनाचे अध्यक्ष झाले,याचा त्यांच्या असंख्य चाहत्याना आनंद झाला असणं स्वाभाविक आहे; पण आमचा आनंद तेवढाच नाही. 'आमच्या घरच्या माणसाला' मान मिळाल्याच्या अभिमानाने आम्हा तळेगावकरांचा ह्या आनंद भारलेला आहे. अप्पा आणि तळेगावकर यांचं नातंच असं अतूट आहे.

अप्पांना आम्ही तळेगावकर हे माहेरच्या माणसासारखे वाटतो. त्यामुळे आणि ते आमच्या अगदी निकट रहात असल्याने इतरांना दिसलेले अप्पा व आम्हाला दिसलेले नजीकचे अप्पा यात फार फरक आहे. त्यांना आम्ही फार जवळून पाहिलेले आहे याचा आम्हाला अभिमान आहे. बाहेरच्या बहुसंख्य मंडळींना 'साहित्यिक गो. नी. दां.' दिसले असतील; पण आम्हाला 'एक माणूस' म्हणून अप्पांचं दर्शन घडलं आहे, घडत असते. हे दर्शन आगळे आहे, अनोखं आहे.

तळेगावात अप्पा विठ्ठलमंदिराजवळच्या घराजवळ राहतात. बाहेर त्यांच्या नावानं पाटी लिहिली आहे. तळेगावकरांना तिचे विशेष काही वाटणार नाही; पण तळेगावकरांकडे एखादा बाहेरचा पाहुणा आला की, तो प्रथम गो. नी. दां. तथा अप्पासाहेबांची चौकशी करील. मग मात्र माझ्यासारखा तळेगावकर,आलेल्या पाहुण्यांना छाती फुगवून त्यांचे घर दाखवील. इतर वेळी मात्र अप्पा आमच्या शेजारी रहायला आहेत हे आम्हाला कित्येकदा जाणवतही नाही. 'गंगाकाठी राहणाऱ्याला गंगेचं विशेष महत्व नसतं' असं म्हणतात. तसं काहीसं अप्पांसंबधी तळेगावकराचं झालं आहे. अप्पा मात्र आलेल्याचं आदरानं स्वागत करतात. कधी बर्फी कधी पेढे, कधी मनुका तर कधी बेदाणे काही ना काही देतात आणि मग आपल्याजवळील पुराणवस्तु, शिवकालीन वस्तु,खड्ग, तलवार, बर्ची, पादुका, वेगवेगळे दगड, दुर्बिण, विविध नाणी, अत्तरे दाखविण्यात गर्क होऊन जातात.

तळेगावात अप्पा फक्त एका पाढऱ्या लुगीवर, पांढऱ्या शुभ्र बंडीवर फिरत असतात. थंडी असल्यास माकडटोपी घातलेली असते. चेहऱ्यावर विलक्षण हास्य तरळत असणारे अप्पा बाहेरच्यांना क्वचितच बघायला मिळाले असतील. अप्पांचा दिनक्रम ठरलेला आहे. जे काही नवीन लिखाण सुचलं असेल ते अगदी पहाटे ३ वाजता लिहायला सुरुवात करतात. अजूनही नियमितपणे अप्पा चार-पाच योगासने करतात. साधारण उजाडले की, ते लगेच आमच्या शेजारील बोळीतून लगबग पोस्टात जातात आणि अगदी न चुकता आसपासची, जवळची कोणाची पत्रं असली तरी तीही आणतात. आपल्याला आलेली महत्त्वाच्या व्यक्तीची पत्रं लगेच लोकांना बोलावून दाखवणं ही त्यांची फार जुनी सवय आहे. काहींना त्याचं हसू येतं; पण माझ्यासारख्याला मात्र त्यातून तळेगावाबाहेरचं अप्पाचं मोठेपण कळून येतं. दिवसभर ते वाचन आणि लेखन यात गर्क असतात. रात्री ते खूप लौकर झोपतात. लौकर म्हणजे आठ वाजता म्हणजे आमची जेव्हा जेवणं होतात तेव्हा अप्पांची मध्यरात्र ! अगदी किमान आहार व खाण्यावर कमालीचा संयम, डॉक्टर सांगतील ते पथ्य काटेकोरपणानं पाळणं हे त्यांचं वैशिष्ट्य आहे.

तळेगाव–परिसराच्या जनजीवनाशी अप्पा एकरूप झालेले आहेत म्हणूनच इथल्या छोटया-मोठया सुखदुःखात ते इतरांच्या बरोबरीने सहभागी असतात. अडचणीच्या वेळी ते शक्य त्या मदतीसाठी पुढे होतात. मागं एकदा तळेगावात दुष्काळ पडला होता. अप्पानी काय करावं ? घरात होतं-नव्हतं तेवढं पाच तोळे सोनं त्वरित देऊन टाकलं आणि दुष्काळग्रस्ताच्या मदतीला फार मोठा हातभार लावला. अप्पा मोठे श्रीमंत आहेत असं नाही; पण 'मी समाजाचा एक देणेकरी लागतो' ह्या त्यांच्या आईच्या शिकवणीतून (आजी दाडेकर), त्यातील श्रद्धेतून ते हे सारं करत असतात.

स्वत:च्या वाढदिवशी ते मागासवर्गीय गरीब भिकाऱ्यांना धान्यवाटप करत असतात. तेही गाजावाजा न करता. एकदा वडगावच्या वनवासी वसतिगृहातल्या विद्यार्थ्यांना धान्याची चणचण भासली. तिथलं धान्य संपत आलं होतं. अप्पांनी त्वरित एक पोतं वडगावच्या वसतिगृहाला पाठवलं. जवळ संपत्ती असली तरी ती कर्तव्यभावनेतून देण्याची प्रवृत्ती व तेवढा उदारपणा असावा लागतो. अप्पाकडे तो आहे. गरीब माणूस दिसला की त्यांना कणव येते. त्याला ते काम देऊन पैसे देतात. हे कामही वैशिष्टयपूर्ण असतं. एखाद्या शस्त्राला, दगडाला, हत्याराला पाहिजे तसा आकार, पैलू द्यावयाच्या त्यांच्याकडील यंत्रावर ते काम करावयाला सांगतात आणि मजुरी न विचारता त्याला जास्त पैसे देऊन टाकतात. शाळेतील व शाळेत न जाणाऱ्या मुलानाही ते काम करून पैसा मिळविण्याची संधी देतात. वाचनालयात बालवाङ्मयासाठी, तरुणांच्या तालिमीसाठी जिथल्या तिथे त्यांनी दिलेली मदत तळेगावकर विसरणार नाहीत. मध्यंतरी अप्पांनी काही हजार रुपये गोरगरिबांना वाटले; पण त्याचे कोणतेही ढोल वाजवले नाहीत. सभा-समारंभाचा झगमगाट करून प्रसिद्धीसाठी त्याचा फायदा उठवला नाही.

आणीबाणीच्या काळातही अप्पानी असंच कार्य केलं; पण तेव्हाच नव्हे तर नंतरही त्यातल्या काही भागाचा गाजावाजा त्यानी केला नाही. आणीबाणीत तळेगावात कृतिसमिती स्थापन झाली. त्याचं अनधिकृत उत्तरदायित्व अप्पांकडं आलं. विरोधी पक्षांचे नेते–पदाधिकारी अटकेत होते. त्यामुळे अप्पा हेच आमचे सर्वेसर्वा होते. अप्पांच्याच पुढाकारामुळे दुर्गाबाई भागवतांची सभा तळेगावात झाली. या सभेचे पडसाद महाराष्ट्रात सर्वत्र उमटले. दुर्गाबाईंची सभा झाल्यावर

आम्ही सर्वजण अप्पाच्या घरी बसलो तेव्हा अप्पानी स्वतः केलेली गाणी, पद्ये म्हटली. आम्हाला हुरूप आला. अप्पाही उत्साहात होते. एकीकडे राजाभाऊ मेहेंदळे व दुसरीकडे अप्पा यानी जुगलबंदीनं गाणी, पद्ये, समरगीते म्हटलीं. आम्हाला इतर ठिकाणी जाण्यास बंदी होती, पण अप्पाचे घर सदैव उघडे होते. आणीबाणीत अप्पा आमच्या पाठीमागे खंबीरपणे उभे होते. काही अडचणीच्या प्रसंगी मार्गदर्शन लागलं तर त्यावर ते तोडगा सुचवत. आणीबाणीत जे जे कार्यकर्ते मिसाखाली अटकेत होते त्याच्या कुटुंबियांसाठी ५ ते ६ हजार रुपये कोणतीही चर्चा न करता त्यानी त्या त्या लोकांच्या घरी गुप्तपणे पोहोचवले. त्यात कोणतीही परतफेडीची अपेक्षा न धरता.

साठी ओलाडलेला अप्पाचा उत्साह हा स्वभावत च आहे. ते सदैव ताजेतवाने असतात. या वयातही त्यांच्या चेहऱ्यावर एक सुरकुती दिसणार नाही की, दात पडलेला नसेल. केस तर अजूनही काळे आहेत. एखाद्या तरुणाला लाजवील अशी भटकंती ते गडागडावर करीत असतात. गड हे तर त्याचे श्रद्धास्थान ! त्याचे लाडके गड आहेत राजगड, रायगड, राजमाची. महाराष्ट्रातील अनेक गडावर ते त्यांच्या वयाला पूर्ण झालेली वर्षे, इतके वेळा जाऊन आलेले आहेत. एकसष्टाव्या वर्षी अप्पानी आपली एकसष्टी एका अभिनव भटकंतीनेच साजरी केली. पुण्याच्या पर्वतीपासून लोणावळ्यापर्यंत एकसष्ट मैलांचा पायी प्रवास त्या दिवशी न थांबता पुरा केला. त्याच्या या अभिनव उपक्रमाने आम्ही फार भारावून गेलो. एकसष्ट वर्षी सत्कारसभासमारंभात न गुतता हारतुऱ्याचे आकर्षणात न गुतता हा माणूस एकसष्ट मैल प्रवास करतो व मी तरुणांपेक्षाही तरुण आहे हे सिद्ध करतो, याचे आश्चर्य वाटावे तेवढे थोडेच !

अप्पांबरोबर गडावर जाण्याचा योग बऱ्याच वेळा आला. भीमाशंकरला गेलो असताना अप्पांच्या हातचे कणकीचे भाजलेले परोठेही खाल्ले आहेत. लोहगडावर गेल्यावर अप्पा काही तरी सांगताना पूर्वीचा काळ उभा राहण्याचा अनुभव आम्ही घेतला आहे. गडावर जाताना एकटे अप्पा कधी जात नाहीत. ते कोणी ना कोणी बरोबर घेणारच. गडावर एखादी प्रेक्षणीय वस्तू सापडली की लगेच अप्पा ती पिशवीत घालणार! मग तो दगड असो वा झाडाची चाकाकती फांदी असो. त्यांचा संग्रह असा वाढत असतो.

असे अनंत छंद संभाळताना अप्पाचं लेखन निष्ठेने व नियमितपणे चाललेलं असतं. ते नवीन पुस्तक लिहायला बसले की बरोबर एखादा मुलगा किंवा मुलगी असणारच. अप्पा सागतात व मुलगा लिहितो हा त्यांचा अनुभव तळेगावात ज्यानी ज्यांनी घेतला आहे त्यात मी आहे त्या वेळी मी महाविद्यालयात शिकत होतो 'भावार्थ ज्ञानेश्वरी' लिहावयाचे काम होते. अप्पा सागत मी लिहीत होतो. अक्षरावर जास्त कटाक्ष होता अप्पाचा. बरेच दिवस चाललेल्या लिखणात अप्पा फारच जवळून पाहावयास मिळाले. अप्पांची कुशाग्र बुद्धी, उत्कृष्ट संस्कृत, संस्कृतमधील टीका त्वरित मराठीरूपांर करण्याची हातोटी एकेक लक्षणीय दृष्टांत अप्पा जेव्हा सांगत तेव्हा मी दिपून जात होतो. एक नवीन अनुभव घेत होतो. लिखाण संपल्यावर अप्पांनी शंभर रुपयाची नोट माझ्या हातावर ठेवली आणि परीक्षेसाठी वापरलेल्या त्या फीमुळे मी पहिल्याच वेळी परीक्षा पास झाला. आमच्या शेजारी एक मुका तरुण राहतो. अप्पा त्याकडून विविध काम करवून घेतात व त्याला पैसे देऊन त्याच्या संसाराला मदत करतात.

अप्पाना हिंदी, इंग्रजी, गुजराथी, बंगाली, कानडी आणि इतर अनेक भाषा अलस्वलितपणे न अडखळता बोलता येतात. भ्रमलगाथा, पडघवली, शितू, माचीवरला बुधी, मृण्मयी, पूर्णामायची लेकरं, जैत रे जैत, स्मरणगाथा अशा विविध साहित्यकृती अप्पांनी मराठी भाषेला बहाल केल्या आहेत व मराठीची बहुमोल सेवा केली आहे. तरी सर्वात विशेष प्रेम भ्रमणगाथेवर. अप्पांनी गाडगेमहाराजाच्या सहवासात राहून त्यांच्या सेवेवर पुस्तक लिहिलं. संतवाङ्मय तर खूप लिहिले तुकाराम, एकनाथ, ज्ञानेश्वर, नामदेव रामदास यांवर लिहिलं. कर्णायन, कृष्णायन अशासारख्या कादंबऱ्यांबरोबर शिवकालीन प्रादेशिक साहित्यापासून ऐतिहासिक कादंबऱ्यांपर्यंत विविध वाङ्मयप्रकार सहजतेने हाताळले. अप्पा कवी आहेत हे बऱ्याच जणाना माहिती नाही. ते हिंदी, मराठीतून कविता करतात. शिवाय तळेगावात गोकुळअष्टमीला न चुकता प्रवचनही करत असतात. अप्पांचं प्रवचन ही सुद्धा एक पर्वणीच असते.

साहित्यसंमेलनाध्यक्षपद मिळाल्यावर त्यांचे उद्गार हे फार खात्रीचे होते. 'मी अध्यक्ष होणारच होतो यात शंका नाही.' अप्पांचा तळेगावात जेव्हा सत्कार झाला तेव्हा अप्पा अगदी भारावून गेले होते, 'हा माझा माहेरचा सत्कार आहे. कारण हा सत्कार माझा नसून मला प्रेरणा देणाऱ्या आपणा सर्वांचा हा सत्कार आहे. तळेगावातील दोन खणी जागेत माझी सेवा घडली आहे. त्यामुळं सर्वत्र होणाऱ्या सत्कारापेक्षा माझ्या माहेरच्या लोकांनी केलेल्या सत्कारामुळे मी अगदी भारावून गेलो आहे. तुमच्या प्रेमामुळे मी पदावर आलो तेव्हा तळेगावला काळिमा लागेल असे माझ्या हातून एकही कृत्य घडणार नाही.' तळेगावकऱ्यांतर्फे भेट म्हणून मावळची प्रसिद्ध घोगडी त्याना परिधान करण्यात आली. ती अंगावर घेताना त्यांच्या डोळ्यात पाणी आले अशा घोगडीबरोबर आधारासाठी चादीची नक्षीकाम केलेली काठीची भेट म्हणून देण्यात आली.

प्रदीर्घ साहित्यसेवा करणारे असे आमचे अप्पा त्यांना तळेगावचा आणि तळेगावला त्यांचा जिवापाड अभिमान आहे. तळेगावातील दोन खणी जागेतच माझी सारी सहित्यसेवा घडली आहे' असे ते अभिमानाने सागतात. तळेगावच्या दोन खणातील हा साधा सुधा साहित्यिक मराठी साहित्यशारदेच्य दरबारातील एका मानाच्या आसनावर आज विराजमान झाला आहे. तळेगावकरांच त्याच्यावरचे प्रेम आणि त्याच्या गौरवातला आनंद त्यामुळे वृद्धिंगत झाला आहे. अप्पाचा हा तळेगावातील साहित्यठेवा पुढे तळेगावकरानी अखंडपणे चालवायचा आहे हे त्याच्या वर उत्तरदायित्व आहे.

## मुक्ताफळे

# भुजंगरावांचे कोडे

'आज देशात सर्वात कठीण काम कुणाचे असेल. तर नोकरभरती करू पाहणाऱ्या सरकारी अधिकाऱ्याचे–'

भुजंगराव देशपांडे हे सरकारी अधिकारी मला सांगत होते,

'अहो, डोकं फिरायची वेळ येते. सरकारी खात्यात जागा भरण्याचा प्रसंग हल्ली फारसा येत नाही; पण येतो तेव्हा चक्रावून जायला होतं. काय आहे सरकारने परिपत्रक काढले आहे की, अल्पसंख्यांक आणि स्त्रिया यांना नोकरीत प्राधान्य द्यावे !'

'मग तर सोपी गोष्ट आहे !' मी म्हटले.

'अहो, पण हे अलीकडले परिपत्रक झाले. आन्तरराष्ट्रीय स्त्रीवर्षात निघालेले. त्या पूर्वीच्या पत्रकानुसार मागासवर्गीयाना प्राधान्य द्यायचे आहे. मागासवर्गीयात पुनः विमुक्त जातीचा विशेष समावेश करावा अशा सूचना आहेत !'

'मग तुम्ही काय करता बुवा ?'

'आम्ही आलेल्या अर्जातून कितीही शिकलेले असले, अगदी विश्वविद्यालयात पहिले-दुसरे आलेले, सुवर्णपदक मिळवलेले–तरी सर्व ब्राह्मण, मराठा, प्रभू, वाणी इत्यादी सर्वांचे अर्ज सादर करतो.'

'अहो, पण यात एखादा माजी सैनिक असला, सैन्यातला नोकरीवाला असला तर प्राधान्य द्यावे अशाही सूचना आहेत ना ?'

'आहेत ना ! पण तो ब्राह्मण, मराठा असला तर पुनः पंचाईत होते आणि आता कालचे नवे परिपत्रक आले आहे की, नोकरभरती करताना, धरणग्रस्ताबरोबर, अपंगाना प्राधान्य मिळावे.'

मला हे कळेना की, धरणाचे काम सुरू झाले की निघणाऱ्या कचेऱ्यात धरणग्रस्त सामावले जात असताना पुन: पुन: धरणग्रस्त कसे काय तयार होतात ? मी शंका विचारताच भुजंगराव म्हणाले–

धरणग्रस्ताची मुले, नातवडे, खापरपणतू हे सर्व धरणग्रस्त समजले जावेत असा मंत्र्यांनी मागल्या दौऱ्यात धरणग्रस्तांच्या परिषदेत खुलासा केला आहे. तो आपल्याला ध्यानात घ्यावा लागतो.'

मी म्हटले– 'म्हणजे तुम्हाला माजी सैनिक, धरणग्रस्त मागासवर्गीय,स्त्रिया, अल्पसंख्यांक आणि अपंग एवढचाना प्राधान्य तूर्त द्यायला लागते.'

'तूर्त हा गत बरोबर आहे. मला परवाच सचिवालयातून कळले की,तुरुंगातील कैद्याच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने, माजी गुन्हेगारांना वयाची अट शिथिल करून प्राधान्य द्यावे. या परिपत्रकावर मंत्र्यांची सही झालेली आहे. आता तुम्ही सांगा आम्ही नोकरी द्यायची कुणाला ?'

मला एक कल्पना सुचली. मी म्हटले–

'भुजंगराव, तुम्ही अशी जाहिरात का देत नाही–सैन्यात जाऊन अपंग झालेल्या, मागास वर्गीयातील विमुक्त अथवा अल्पसंख्यांक अशा अपंग उमेदवारानीच अर्ज करावे. अर्जदार पुरुष नसल्यास तो स्त्री नसेल तर सैन्यात गेलेली नसेल, तर पूर्वाश्रमीची गुन्हेगार असावी.'

'छे : छे : अहो, अशी जाहिरात देता येणार नाही. स्त्री व पुरुष असा भेदाभेद करणारी ही जाहिरात प्रसिद्ध झाली तर स्त्रीमुक्ती आंदोलनवाले स्वस्थ बसतील काय ? जाहिरातीत असा भेद करता येणार नाही. शिवाय जाहिरात स्पष्ट दिली तर पोस्टाचे उत्पन्न बुडते. साधारणपणे एका जागेसाठी दहा हजार अर्ज येतात. सर्टिफिकेटच्या प्रती जोडल्यावर अर्जाचे पाकिट जाडजूड होते. सव्वा ते दीड रुपया पोस्टाला मिळतो. म्हणजे दहा हजार रुपयांचे सरकारचे नुकसान नाही का ?'

भुजंगरावाची अडचण समजण्यासारखी होती; परंतु जसजसा आपला देश प्रगतिशील व आपले मागासलेपण कमी कमी होत जाईल तसतशी, मागासलेल्याची संख्या कमी कमी होत जाईल, एवढा आशेचा किरण मला दिसत होता. म्हणून मी भुजंगरावांना म्हटले-

'मागासलेल्या जाती हळूहळू कमी होणार हीच एक समाधानाची गोष्ट आहे–!'

भुजंगराव हसू लागले. त्यांनी सांगितले–


'अहो, मागासलेल्या जातीची संख्या कमी न होता दिवसेंदिवस वाढती आहे. परीट, वडार या जातीनी आम्हाला मागासलेले समजा ! असा सरकारकडे तगादा लावलेला आहे. तिकडे निवडणुकीच्या मागोमाग बहुधा ही मागणी केव्हा तरी मान्य होईल !

'म्हणजे मागासवर्गीयाची संख्या कमी होण्याचीही शक्यता नाही ?'

छे : छे : आपण अशीच प्रगती करीत राहिलो तर सर्वजण पटापट मागासलेले होण्याकरता जारीने प्रयत्न करतील असे दिसते.'

भुजंगरावाचे कोडे सोडवणे माझ्या शक्तीबाहेरील काम होते.

–ग्यानबा



प्रजासत्ताक दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा

26 जानेवारी 1950 रोजी, भारतीय जनतेने सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही प्रजासत्ताक राज्याचा पाया रोविला गेल्या. 31 वर्षात आम्ही बऱ्याच यशाचे मानकरी ठरलो आहोत.

आमचे यश :—

- ☐ लोकशाहीची भक्कम पायावर उभारणी
- ☐ वेळोवेळी पडणाऱ्या अन्न तुटवड्यावर मात
- ☐ एक औद्योगिक आघाडीवरील देश म्हणून गणना
- ☐ विज्ञान आणि तंत्रशास्त्रात अग्रेसर म्हणून मान्यता
- ☐ तीन वेळा परकीय आक्रमणावर यशस्वी मात
- ☐ आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर आमच्या शब्दास महत्व

तरी पण, सर्वांना संपूर्ण सामाजिक न्यायाची हमी देऊन आणि जनतेच्या जीवन राहणीचा दर्जा वाढवून, आम्हाला अजून बरीच मजल मांठावयाची आहे.

भक्कम राष्ट्रीय ऐक्य निर्माण करूनच हे कार्य शक्य आहे.



**प्रगति आणि सुरक्षिततेसाठीं राष्ट्रीय एकात्मता**
**आणि धर्मनिरपेक्ष शक्तींची एकजूट करा.**

# अवती-भवती

शरद कृष्णन्

इंदिराजीच्या पडत्या काळात मासिक 'सूर्य' मधून जनता पक्षावर तोफा डागणारी मनेका गांधी तिच्या पतीच्या—संजयच्या—निधनानंतर उसळून उभी राहील असा अंदाज इंदिरानियुक्त राज्यसभासदस्य आणि इंदिरा— सजयसाठी सातत्याने लेखणी झिजवणारे थोर पत्रकार सरदार खुशवंतसिंग यानी व्यक्त केला होता. संजयच्या निधनानंतर त्याला आकाशवाणीवरून श्रद्धांजली वाहताना— प्रती दुर्गा म्हणून त्यानी प्रशस्तिपत्र बहाल केलेली ही मेनका स्वाभाविकरित्या आणि वेगाने राजकारणात खेचली जाईल असा अंदाज होता. मनेकाचीही प्रारंभीच्या काळात त्या दृष्टीनेच हालचाल होती; परंतु ओरिजनल दुर्गामातेच्या मनात काही वेगळाच विचार होता. तिने डोळे वटारले आणि संजयची विधवा वृत्तपत्राच्या पहिल्या पानावरून थेट स्वयपाकघरात निघून गेली— आणि बाईंचे दुसरे सुपुत्र राजीव गांधी, ममीचा हात धरून पहिल्या रांगेचे मानकरी बनले ! दरम्यानच्या काळात घरात बसलेल्या मनेकाबाईंनी आपल्या हाती लेखणी घेतली आणि बदनामीच्या झंझावातातून ताऊन—सुलाखून बाहेर पडलेल्या आपल्या पतीच्या आठवणी लिहून काढल्या, मजकूर थोडा असला तरी संजयचे व्यक्तिमत्त्व प्रचंड होते. हृदयस्पर्शी घरेलू आठवणीतून संजयच्या खाजगी जीवनाची अपरिचित बाजू पुढे येत असली तरी त्याचे व्यक्तित्व पेश होत नव्हते. ही लंगडी बाजू जोरकसपणे उचलली जावी म्हणून संजयच्या हजारो छायाचित्रांची चळत डोळ्याखाली घालून मनेकाबाईंनी निवडक ४७५ चित्रे निवडली आणि त्याला वर उल्लेख केलेल्या मजकुराची जोड देऊन संजयचे वादग्रस्त आणि वादळी, कमालीचे अप्रिय आणि टोकाचे प्रिय असणारे हे व्यक्तित्व 'संजय गांधी' या ग्रंथाद्वारे पेश केले. राजकीय ग्रंथ प्रकाशनात आघाडीवर असलेल्या विकास पब्लिकेशनद्वारा प्रकाशित झालेल्या या पुस्तकाच्या प्रकाशनसमारंभास इंदिराजी हजर होत्या आणि १६५ रुपयांची सणसणीत किंमत असूनही हे पुस्तक चांगले तेजाळले आहे. गाजते आहे.

संजयच्या वादग्रस्त कारकीर्दीत काही खुशवंतसिंग लाईनचे पत्रकार सोडले तर तो या क्षेत्रातील मंडळीमध्ये कमालीचा अप्रिय होता. जनता राजवटीच्या काळात, त्याचे जे वाभाडे निघाले त्याचे पाटच्या पाट वर्तमानपत्रातून रोज वाहात होते आणि आधीच अप्रिय असलेल्या संजयचे व्यक्तिमत्त्व पूर्णपणे डागळून गेले. जो मजकूर प्रसिद्ध होत होता तो वाचत असताना, जे होताय ते योग्य होत आहे अशीच सर्वसाधारण भावना होती. पण हेही दिवस मागे पडले. पडद्यामागील हालचालीची सूत्रे त्याने आपल्या हातात घेतली आणि सत्तेच्या सिंहासनावरून रस्त्यावर फेकल्या गेलेल्या आपल्या आईला पुन्हा पूर्वस्थानावर आणून बसवले. नवनिर्वाचित लोकसभेमध्ये तो सन्मानपूर्वक परत आलाच, पण थेट त्याच्याशी नाते सांगणाऱ्या दीडशे खासदाराचा गोत त्याने उभा केला. 'राज्य मम्मीचे आणि सूत्रधार चिरंजीव' हा जुना मामला पुन्हा आकाराला आला. संजयचे नाव निघाले आणि उत्तर प्रदेशात इंदिरा काँग्रेस आमदाराची मुडी एका सुरात हालली. त्याना साहेबदस्तुर मुख्यमंत्री म्हणून हवे होते. मम्मीने सूचना धुडकावून लावली. तिच्या योजना निराळ्या होत्या. त्या आकारासही येऊ लागल्या होत्या. राजपुत्र विंगेत राजवस्त्रे परिधान करून उभा होता; पण नियतीच्या मनात काही तिसरेच होते. विजेच्या वेगाने अस्मानी झेप घेतलेले हे व्यक्तित्व, अपघाताचे निमित्त होऊन काळाच्या पडद्याआड फेकले गेले !

### व्यक्तिगत आठवणीतून ओळख

व्यक्तिशः मी संजयच्या पुरस्कर्त्यांपैकी नव्हे. जनता राजवट सत्तेवर येण्यापूर्वी आणि आणीबाणीच्या काळाकुट्ट कालखंडामध्ये, राज्याराज्यातून त्याचा उदो उदो चालला होता. या चिरंजिवानी थोर मातेच्या पोटी जन्म घेण्याशिवाय असे काय केले आहे की, त्याच्या आगमनासाठी पायघड्या घातल्या जाव्यात आणि त्याचे सत्कारसमारंभ दैनिकांच्या पहिल्या पानावर ओसंडून जावेत, असा जो प्रश्न अनेकाच्या मनात त्या काळात निर्माण झाला होता तो मलाही पडला होता. आणि आजही माझ्या त्या मताची फेरतपासणी करण्याची गरज मला वाटत नाही. जनता राजवट सत्तेवर आल्यावर न्यायासनाची ज्या पद्धतीने त्याने पायमल्ली चालवली होती आणि केवळ तारखांचे खेळ खेळत ती चालवून घेतली जात होती, त्यामुळे असंख्य मंडळी अवाक् झाली होती. तथापि खिळखिळी झालेली जनता राजवट, चरणसिंगांना मधाचे बोट दाखवून त्याने संपुष्टात आणली आणि चरणसिंगाची खुर्ची अलगद काढून घेऊन, मम्मीची वाट त्याने मोकळी करून दिली. पडद्यामागील सूत्रे त्याने ज्या पद्धतीने हलवली होती त्यावरून राजकीय खेळीमधील त्याची चतुराई पुरेशी स्पष्ट झाली होती. झाडे लावा किंवा कुटुंब लहान ठेवा, हे सांगणाऱ्या सजयचे कौतुक करण्यासारखे नव्हते; परंतु सत्तांतराच्या राजकारणामधील त्याचा वाटा वादातीत मानावा लागेल. आणि म्हणून इंदिराजी परत सत्तेवर आल्यावर नव्या तेजाने तळपणाऱ्या संजयला जनमानसात, विशेषतः तरुण पिढीमधील असंख्य मंडळीच्या हृदयात महत्वपूर्ण स्थान होते. त्याचा अपघाती मृत्यू— अनेकाना धक्का देऊन गेला. राजाश्रयाचा आस्वाद घेणाऱ्या मंडळीनी केलेल्या लाचार अतिशयोक्तीचा भाग सोडला तरी संजय ही एक प्रतिदिनी बलिष्ठ होत जाणारी शक्ती होती हे नाकारता येणार नाही. मनेका गांधी यांनी लिहिलेल्या या पुस्तकामधील मनेकाच्या अनेक व्यक्तिगत आठवणीतून 'माणूस' म्हणून सजयची तिने ज्या पद्धतीने ओळख करून दिली आहे ती खचित चटका लावणारी आहे. असंख्य कृष्ण धवल चित्रानी लगडलेल्या या पुस्तकात जो काही धावता मजकूर आहे त्याचा गुणविशेष हा, की सजयचे समर्थन करण्याचा त्यात जराही प्रयत्न नाही. मनेकाबाई म्हणतात, माझ्या पतीचे समर्थन करण्याचा माझा हेतू नाही. त्यांचे हे विधान प्रामाणिक आहे हे त्याच्या लेखणीतून उतरलेल्या मजकुरावरून पुरेशा स्वरूपात स्पष्ट होते. नेकदिल पती म्हणून संजयने त्याच्या जीवनात स्थान मिळविले

आणि अनेक छोटयामोठया प्रसंगातून त्याच्या वर्तनाचे जे विविध पैलू मनेकाबाईंना पहावयास मिळाले त्या स्वभाववैशिष्टयाचे अतिशय मार्मिक शब्दात वर्णन करून त्यांनी आपल्या दिवंगत पतीचे रेखीव शब्दचित्र उभे केले आहे.

## छायाचित्रांचा पाऊस

मनेका गांधींचे हे पुस्तक छायाचित्रानी अक्षरशः लगडलेले आहे छायाचित्राची निवड कल्पकतेने केलेली आहे ही सर्व कृष्ण-धवल छायाचित्रे परिपूर्ण स्वरूपात पेश केली गेली असल्याने संजयचे हे चित्ररूपदर्शन विलक्षण बोलके झाले आहे. आपल्या आजोबाच्या घरी, तीन मूर्तीच्या प्रशस्त वैभवशाली हिरवळीवर बागडणारा संजय, घरात येणाऱ्या बडया पाहुण्याबरोबर मजेत जलविहार करणारा संजय, राजीवला मागे बसवून, तिचाकी सायकलीची मजा लुटणारा हा जवाहरलालजीचा लाडका नातू, प्रियदर्शनीचा प्रिय पुत्र, बाल्यावस्था सपवून बघता बघता कुडता-पायजम्यामधील देखणा तरुण झाला. सर्वसत्ताधारी आईच्या छायेत होणारे कोडकौतुक, कडवट कालखंडामधील कोर्ट-कचेऱ्या, माताजीबरोबर पुन्हा सत्तास्थानी आगमन आणि गगनी भिडणाऱ्या महत्त्वाकांक्षाचा क्षणात झालेला चक्काचूर या साऱ्या संजयपर्वाचे दर्शन या वादग्रस्त वादळी व्यक्तिमत्त्वाबद्दल हातचे राखून बोलणाऱ्या माझ्यासारख्या मंडळीनाही एक नवा अनुभव देऊन जाते. हजार शब्दाचा वाहता मजकूर जे सांगू शकणार नाही ते सांगण्यास एखादे बोलके चित्र पुरेसे आहे आणि इथे तर बोलक्या चित्रांचा अक्षरशः पाऊस आहे! मनेकेच्या लेखणीतून उतरलेले शब्द मर्यादित असले तरी अर्थवाही आहेत. कदाचित जास्त लिहिले तर कोठे तरी फसून जाऊ असे वाटत असल्याने असेल, पण तिने आपल्या लेखणीवर छान बंधन घालून घेतले असल्याने मोजक्या शब्दाना खचित वजन प्राप्त झाले आहे. पत्रकारिता करत असल्यामुळे तिला शब्दाचे मोल चांगले ज्ञात आहे. संवेदनाक्षम लेखिका म्हणून तिचा निर्देश करता यावा अशा तोलामोलाने तिने हा मजकूर हातावेगळा केला आहे.

## स्वभाववैशिष्टयांचे दर्शन

कठीण परिस्थितीत असतानाच आपल्याला आपल्या पतीच्या स्वभाववैशिष्टयाचे दर्शन झाले असे सांगून मनेका लिहिते, ' अमेथी-मध्ये संजयचा पराभव झाला त्या वेळी आम्ही दोघे अमेथीमध्ये होतो. आम्ही पराभूत झालो होतो. मी निराश होते. विचित्र मान-सिक अवस्थेमध्ये आम्ही गाडीने लखनौला आलो आणि खाजगी विमानाने दिल्लीला निघालो.कोणते दिवस समोर वाढून ठेवले आहेत याबाबत चिंताग्रस्त आवाजात मी काही सहकाऱ्यांबरोबर मागे कुज-बुजत बसले होते. संजय पुढे कॉकपिटमध्ये होता. तो अस्वस्थ असला तरी निराश नव्हता. वैमानिकाचे कौशल्य थोडा वेळ न्याहळल्यावर तो हसतमुखाने पुढे झाला आणि त्याने वैमानिकाची जागा घेतली. ज्या वेळेला असंख्य प्रतिकूल विचारानी आम्हा सर्वांच्या डोक्यात गर्दी केली होती, त्या वेळी हा सफाईने हवाई सफर करत होता. त्या वेळी त्याचे निरीक्षण करत असताना मी काय तोलामोलाच्या माण-साची पती म्हणून निवड केली आहे याची मला कल्पना आली.

'अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही त्याची मिस्किल विनोद बुद्धी कशी जागरूक होती याचा एक मजेशीर दाखला वाचल्यावर हा मनुष्य जेवढा रुक्ष वाटतो तेवढा रुक्ष खचित नसावा असे जाणवते. जनता राजवटीमार्फत संजयवर कारवाई चालू असताना सी. बी. आय. च्या अधिकाऱ्यांनी खेचाखेच भरलेली एक काळी अॅम्बेसेडर रोज त्याचा पाठपुरावा करत असे. आम्ही जेथे जाऊ तिथे ही गाडी आमच्या मागोमाग फिरत असे. दोन-चार दिवस या गोष्टीचे निरीक्षण केल्या-वर संजयने आपली गाडी अॅबेसॅडर जवळ नेली आणि गाडीतील अधिकाऱ्याना तो खाशा हिन्दीमध्ये म्हणाला, 'पेट्रोल सध्या विलक्षण महाग आहे, दररोज माझ्या मागे गाडी मिरवण्याचा हा व्याप तुम्हाला हवाय कशाला ? तुम्ही असं करा ना माझ्या मेटॅडोरमध्ये मी तुम्हाला जागा करून देतो, पेट्रोलही वाचेल आणि माझ्यावर तुम्हाला बारीक लक्षही ठेवता येईल ! राजसुख अनुभवून दिवस फिरल्यावर चारही बाजूनी बदनामीचा प्रवाह अखंड वाहात असताना आणि उद्या कोणता प्रसग ओढवेल याची शाश्वती नसताना अशी तरतरीत विनोदबुद्धी शाबूत ठेवणे ही साधी गोष्ट नव्हे.

' अत्यंत सामान्य व्यक्तीबाबतची एखादी बारीकशी गोष्ट त्याला तपशीलवार समजली असेल तर ती त्याच्या डोक्यात घट्ट बसत असे आणि योग्य वेळी तिचे त्याला स्मरणही होत असे. १९७९ मध्ये संजयला अनेक वेळा तुरुंगात जावे लागले, तुरुंगामध्ये त्याची एका चोवीस वर्षाच्या तरुणाशी गाठ पडली. बिचारा खुनाच्या प्रकरणात गोवला गेला होता. आपण कसे निर्दोष आहोत हे त्याने संजयला पट-वून दिले. पुढे लोकसभा निवडणूक जिंकून संजय पुन्हा सत्तास्थानी आल्यावर त्याने त्या तरुणाच्या केसची संबंधित अधिकाऱ्यामार्फत फेरतपासणी करवली. तो तरुण खरोखरच या प्रकारणी अकारण गुतला होता, हे पुराव्यानिशी सिद्ध झाल्याने त्याची सुटका झाली. '

## चटका लावणाऱ्या व्यक्तिगत आठवणी

संजयच्या चारित्र्याबद्दल अनेकदा वेडेवाकडे बोलले जाते. या-बाबत अनेक कथा चवीने सांगितल्या जातात. सत्य परिस्थिती काय असेल ती असो, पण ज्या जिव्हाळयाने त्याचे मनेकावर आणि घरच्या मंडळीवर लक्ष होते त्याचे मनेकाबाईंनी केलेले वर्णन चटका लावणारे आहे. मनेकाबाई लिहितात,

' ज्या वेळी मी गर्भवती होते, त्या वेळी त्याचे सतत माझ्याकडे बारीक लक्ष होते. माझ्या बारीकसारीक आणि प्रसंगी विक्षिप्त वाटणाऱ्या इच्छा त्याने आवर्जून पुऱ्या केल्या. माझी मनःस्थिती बरी नाही अशी नुसती शंका जरी आली तरी सारी कामे आणि प्रसंगी पार्लमेन्टमधील हजेरी बाजूला ठेवून तो माझ्यासाठी घरी थांबे. मी डॉक्टरकडे इंजेक्शनसाठी गेले की, माझ्याबरोबर तो असे. मी त्याच्या मुलाची माता होण्यासाठी हॉस्पिटलमध्ये गेले, त्या वेळी तो केवळ बरोबरच नव्हता तर बाळंतपणाच्या कळा-वेदनातून मातृत्वाच्या आनंदाकडे जात असताना तो अगदी माझ्या शेजारी होता. नंतर मला डॉक्टरानी सांगितले की, आपली पत्नी अपत्याला जन्म देत असताना पत्नीच्या शेजारी उभा राहणारा हा पहिलाच पतिराज त्यांनी पाहिला. अपत्य-जन्मानंतर संजयने डॉक्टराशी चर्चा करून

बालसंगोपनाबाबतच्या आपल्या अनेक शंकांचे निरसन करून घेतले. बाळतपणानंतर येणारे स्थूलत्व कमी व्हावे म्हणून मी कोणता आहार घ्यावा, याचा सारा तपशील त्याने मला पुरवला. कार्यमग्न व्यक्तीचे घरी दुर्लक्ष होते, संजयचे तसे नव्हते. असंख्य कार्यक्रम हाती असले तरी कोणत्या गोष्टीला किती प्राधान्य द्यावे याची सुदर सागड तो घालत असे. नववर्षाचे निमित्त पकडून आम्ही कोठे बाहेर गेलो नव्हतो. एकदा मी त्याला रागावून म्हणाले, नववर्षाचा प्रारंभ घरबसल्या करणारी आपली पहिलीच जोडी असावी आणि त्या वेळी नववर्षाच्या रात्री त्याने मला विमानातून थेट काश्मीरला नेले.

'त्याच्या मृत्यूपूर्वी केवळ दोन दिवस आम्ही घरेलू गप्पा मारत बसलो होतो. तो मला म्हणाला, 'अनेक प्रश्नाबाबत मुलाना उत्सुकता असते. प्रश्न विचारून ती भंडावून सोडतात. फिरोझने जर असे काही बालसुलभ प्रश्न विचारले आणि तुला त्याचे उत्तर माहीत असले तरच ते त्याला साग. त्याला चुकीची माहिती कधी देऊ नकोस. त्याला साग–मी माहिती काढून उत्तर देईन. त्याला प्रश्न विचारण्याबाबत उत्तेजन देण्याची आणि त्याला योग्य उत्तरे देण्याची तुझी जबाबदारी आहे.'

### व्यक्तिमत्त्वाची जडणघडण

आपल्या या पुस्तकात आपल्या पतीच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण कशी झाली असावी यावरही मनेकाने भाष्य केले आहे. त्याच्या आईचा त्याच्यावर जबर प्रभाव होता. संजयच्या आईचे–इंदिराजींचे आपल्या दोन्ही मुलांवर बारीक लक्ष होते. वात्सल्य आणि शिस्त याची सुदर सागड घालून त्यानी आपल्या दोन्ही मुलांचे संगोपन केले. आपले बरोबर आहे याची आपल्याला पुरेपूर खात्री असली तर कशालाही न घाबरता आपल्या मताचा पुरस्कार करण्याची शिकवण त्यानी आईकडूनच उचलली. संजयच्या विश्वविख्यात आजोबाचा जमाना मनेकाने पाहिला नसला तरी जवाहरलालजीना जशी अनेक विषयात रुची होती तशीच ती संजयलाही होती असे मनेका म्हणते. संजयच्याबाबतीत असेही म्हणता येईल की, आजोबा जवाहरलालजी काय किंवा आई इंदिराजी काय, या दोघाजवळही त्वरित निर्णय घेण्याची क्षमता नसली तरी संजयमध्ये ती पुरेपूर होती. या संदर्भात खुशवंतसिंग यांनी सांगितलेल्या एका आठवणीचा उल्लेख करता येण्यासारखा आहे–'काही महत्त्वाच्या मुद्द्याबाबत निर्णय द्यावा म्हणून मी त्याच्याकडे गेलो. माझ्याजवळ टिपण होते. अपेक्षा अशी होती की, तासभर चर्चा करून पुन्हा पुढील आठवड्यातील वेळ मागून घ्यावा. ठरल्या वेळी मी त्याच्या कचेरीत गेलो.' असे सांगून खुशवंतसिंग म्हणतात–'कोणत्या विषयावर चर्चा आहे याची त्याला कल्पना होती. मी आणलेल्या टिपणावरून त्याने घाईने नजर फिरवली: मला दोन-तीन वेचक प्रश्न विचारले आणि मी उत्तर देताच त्याने मी विचारासाठी नेलेल्या चारही मुद्यांबाबतचा आपला निर्णय तिथल्या तेथे देऊन टाकला. चारपैकी किमान दोन निर्णय तरी निश्चितपणे मला अप्रिय वाटत होते आणि तसे होणार याची त्यालाही कल्पना होती. असे असूनही तिथल्या तिथे तोंडावर निर्णय देऊन त्याने मला चकित केले.'

तर असा हा संजय. त्याच्या पत्नीने रेखाटलेले त्याचे चित्र अनेक नवीन गोष्टी सांगून जाते. त्याच्या पत्नीवर त्याचा जबर प्रभाव होता. एका ठिकाणी ती लिहिते की, 'त्याच्या निर्णयशक्तीवर त्याचा इतका दाडगा विश्वास होता की, एखाद्या दिवशी त्याने मला सांगितले असते की, उद्या सूर्य पश्चिमेला उगवेल, तर उजाडत्या दिवशी मी खरोखरच पश्चिमेला पाहिले असते.' संजयच्या व्यक्तिमत्त्वाचा हा असा दाडगा प्रभाव असूनही त्याच्याबद्दलचे लिहिताना तिने एक ओळही दडपणाखाली लिहिल्याचे जाणवत नाही, हे विशेष मानावे लागेल.

भारताच्या राजकीय क्षितिजावर आला आला म्हणत असतानाच ज्याने मातृकृपेमुळे का होईना, पण वायुवेगाने वाटचाल केली आणि काही विशेष करून दाखविण्यापूर्वीच अनेक समज-गैरसमज मागे ठेवून कायमचा जो निघून गेला त्या संजयच्या आयुष्यामधील सगळ्यात जवळच्या व्यक्तीने लिहिलेले हे पुस्तक अलीकडे प्रकाशित झालेल्या पुस्तकापैकी एक उत्तम पुस्तक मानावे लागेल.

### टीकेविना

मनेका गांधी लिखित 'संजय गांधी' या पुस्तकाने दिल्लीत सध्या धमाल उडवून दिली आहे. पुस्तकाची किंमत भले १६५ रु. असली तरी आपण ते घेतले तर त्याची योग्य वेळी योग्य जागी दखल घेतली जाईल अशा भावनेतून मंडळी पुस्तक घेत आहेत, त्याबद्दल बोलत आहेत आणि नजरेला पडेल अशा पद्धतीने ते हातातून मिरवलेही जात आहे. या पुस्तकासाठी छायाचित्रांची चवड लेखिकाबाईसमोर ठेवणाऱ्या दिल्लीतील असंख्य छायाचित्रकाराना मात्र अद्यापी दिडकीचा मोबदला न मिळाल्याने– ही मंडळी अस्वस्थ आहेत!! अर्थात त्याबाबत काही उघड प्रतिक्रिया होणे शक्यच नाही. ☐

**संजयचरित्र**
**किं. रु. १६५**


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना
हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही. –डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर / प्रा. झुंबरलाल कांबळे
मूल्य : वीस रुपये. राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

## “आज अगदी मोकळेमोकळे वाटत आहे. माझी कोणाबद्दलही तक्रार नाही. माझ्या वाटचाला आलेले आयुष्य मी चांगल्या तऱ्हेने घालविले आहे. माझी नोकरी समाजाच्या भल्यासाठी आहे ही जाणीव ठेवून मी वागलो आहे....”

# —सुरेश पेंडसे

रामन राघवन, फिरोज दारूवाला इत्यादी मोठ्या गुन्ह्यांच्या शोधात प्रशंसनीय कामगिरी बजावलेल्या, अनेक पदकांचे मानकरी असलेल्या व नुकतीच निवृत्ती स्वीकारलेल्या एका कर्तव्यदक्ष पोलिस अधिकाऱ्याची प्रदीर्घ मुलाखत....

चंद्रशेखर राजे

माझे मित्र प्रा. वि. चिं. फडके यांच्यासह श्री. सुरेश पेंडसे यांच्या दादर मुक्कामी, त्यांना ‘राष्ट्रपति पदक’ मिळाल्याबद्दल अभिनंदन करण्यासाठी गेलो होतो. दारावर ‘सुरेश पेंडसे’ या पाटीव्यतिरिक्त त्यांचा हुद्दा, अधिकार दाखविणारे काहीच नव्हते. दरवाजाच्या फळीवर गणवेषधारी, हातात रायफल घेऊन पहारा करणारा (संत्री) बाहुला डकविलेला आहे. पोलीस खात्याशी संबंध दाखविणारी हीच एकमेव खूण दिसली. एका प्रशस्त दिवाणखान्यात प्रवेश केल्यानंतर नमस्कार, ओळख आणि अभिनंदन इत्यादी सारे रीतसर पार पडले. प्रा. फडके त्यांच्याशी गप्पा मारत होते म्हणून मी श्री. पेंडशांसकट साऱ्या दिवाणखान्यावरून नजर फिरविली. समोरची सारी भिंत भरून एक निसर्गचित्र होते. अत्यंत सुबक आणि सुंदर वस्तूंनी दिवाणखाना सजविला होता. चोखंदळपणा, अभिरुचि-संपन्नता आणि उपयुक्तता यांचा सुरेख संगम झालेला दिसून येत होता. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याचा दिवाणखाना कसा असतो ठाऊक नाही; पण हा दिवाणखाना एखादया वरिष्ठ पदावरच्या व्यक्तीचा वाटावा असाच होता. माझी नजर श्री. पेंडसे यांच्याकडे पाहताना माझ्या मित्राचे उद्‌गार आठवले. एकजण म्हणाला होता की, त्यांना पाहिल्यानंतर नटश्रेष्ठ नानासाहेब फाटकांची आठवण येते. दुसऱ्याने सांगितले होते की, ते बोलताना, त्यांचा आवाज ऐकताना डॉ. श्रीराम लागूंची आठवण येते. त्या दोघांच्या गप्पा संपत आल्याचे लक्षात येताच मी माझ्या प्रश्नांची जुळवाजुळव सुरू केली. त्यांनी माझ्याकडे पाहताच मी जवळजवळ साऱ्या प्रश्नांचा भडिमारच त्यांच्यावर एकदम सुरू केला. त्यांनीसुद्धा माझ्याजवळील साठा संपेपर्यंत मग मला अडविले नाही.

¤

आपल्याला भारतीय पोलीसपदक, मुख्यमंत्र्यांचे सुवर्णपदक आणि राष्ट्रपतींचे पदक असा तिहेरी सन्मान मिळाला आहे. आता आपण निवृत्तही झालेले आहात. एका कर्तव्यदक्ष आणि गुणवान अधिकाऱ्याचे पोलीसखात्यातील अनुभव जाणून घ्यायचे आहेत. पोलीस-खात्याबद्दल साऱ्यांचेच—अगदी सामान्यापासून असामान्यांपर्यंत कोणा-चेच मत चांगले नाही. कोणीही या खात्याबद्दल चांगले उद्‌गार काढीत नाहीत. उत्तरप्रदेशातील एका रामशास्त्री बाण्याच्या न्यायमूर्तींनी आपल्या एका निकालात व्यक्त केलेले उद्‌गार खात्याला फारच झोंबले. ते म्हणाले ‘पोलीसखाते म्हणजे ‘Dacoits in Uniform’, ‘हिंसा’ या विषयावर संशोधन, अभ्यास करणारे आणि मराठीतील श्रेष्ठ नाटककार विजय तेंडुलकर म्हणाले, ‘गुंडाचे संरक्षण करणारे आणि सज्जनांना छळणारे खाते.’ (गीतेतील ‘परित्राणाय साधू-नाम्’च्या अगदी विरुद्ध) असे का व्हावे? समाजाचा लष्करावर (बाहेरच्या आक्रमणापासून संरक्षक म्हणून) आणि पोलीसखात्यावर (अंतर्गत सुरक्षा आणि सुव्यवस्थेचे जागले म्हणून) विश्वास असतो. ते त्यांच्यावर विसंबूनच आपापली कामे करतात, सुखाने निद्रा—घेतात. इंग्लंडचा बॉबी जसा सामान्य इंग्रज माणसाला आपला मित्र वाटतो, तसा आपला सखाराम किंवा पांडू वाटत नाही, असे का? ज्या तऱ्हेच्या घटना उजेडात येतात, कोर्टासमोरील गुन्ह्याची जी माहिती वाचावयास मिळते त्यावरून समाजाचा असा समज झाला आहे की ‘कुंपणच शेत खात नाही ना?’ ‘रक्षणकर्ते भक्षणकर्ते’ तर होत

नाहीत ना ? या व अन्य प्रश्नांची सविस्तर आणि मनमोकळी उत्तरे आपण द्यावीत ही इच्छा.

¤

**श्री. पेंडसे :** इ. स १९४३ साली मी खात्यात प्रवेश केला. त्या अवधीत मला अनेक अनुभव आले, अनेक गुन्हे आणि गुन्हेगार मी हाताळले. पोलिसाकडे पाहण्याची दृष्टी कशी आहे ते मला ठाऊक आहे. तो 'दारुड्या' आहे, 'बाईबाज' आहे, 'लाचखाऊ' आहे, 'उद्धट' आहे. इ. इ. पण प्रत्यक्ष त्यांच्याशी संबंध आल्यानंतर मग वाटायला लागते की, आपण पेंडशांशी बोललो, त्याना पाहिले. ते आपल्याला वाटले तसे नाहीत बरे का! त्यांच्यात हे गुण (?) नसतील; पण इतरात असतील. उद्या जर माझ्याबद्दल काही वेडेवाकडे तुम्ही ऐकलेत वा वाचलेत तर तुम्ही म्हणाल, 'अरे, मला वाटले होते की हा मनुष्य चागला आहे पण तसे नाही बरे का!' तुम्ही माझ्याबद्दल 'पॉईंट ब्लॉक' चांगले म्हणणार नाही. माझ्याबद्दल वेडेवाकडे सागणाऱ्याला 'हे निखालस असत्य आहे. तू खोटे बोलतोस' असे सांगणार नाही. एका व्यक्तीबद्दलचा हा समज नाही, साऱ्या खात्याबद्दलच ही समजूत आहे. त्याला कारण आहे हे खाते (Force) इंग्रजाची निर्मिती आहे. आपली निर्मिती नाही. इंग्रजानी हे खाते प्रामुख्याने राजकीय चळवळी, स्वातंत्र्याची चळवळ दडपण्यासाठी निर्माण केले. राजबंदी हिरो ठरत असे आणि पकडणारा व्हीलन ठरत असे. त्याचप्रमाणे पोलीसचौकीवर तक्रार घेऊन येणारे नागरिक जे सागतात ते सारे आम्ही 'Gospel Truth' मानीत नाही म्हणूनही त्यांचा आमच्यावर राग असतो. ते जे जे सागतात ते ते आम्ही पुराव्यानिशी सिद्ध झाल्याशिवाय स्वीकारीत नाही. एक उदाहरण सांगतो. एक मुलगा व त्याची आई चौकीवर आली. मुलाने सागितले की, आपल्या बापाचा कोणी तरी खून केला आहे. त्याने रडत रडत सांगितले की, बापाचा मृतदेह शेतात पडला आहे. तुम्ही गुन्हेगाराला पकडा इ. तपासाअंती असे कळले की, त्या माणसाचा खून त्याच्या आईने (मयताच्या पत्नीने) केला होता. तो नवरा आपल्या पत्नीच्या चारित्र्याविषयी सतत (अकारण) संशय घेत असे म्हणून कंटाळून, वैतागून तिने त्याचा खून केला. पित्याचा खून होताना तो तक्रारदार मुलगाही तेथेच हजर होता. अशी असख्य उदाहरणे सांगता येतील. कधीकधी असे होते की चौकीवर तक्रार घेऊन येणारे बनविलेले, खोटेच (distorted, false versions) सागत असतात. पो. अधिकारी हे सारे ऐकत असतो. कधीकधी असेही घडते की, जखमी माणूस समोर असतो, तो बेशुद्ध पडण्याच्या अवस्थेत असतो, कालातराने तो मरण्याचीही शक्यता असते, अशा परिस्थितीत तो अधिकारी सारी चौकशी करीत असतो. शुद्धीवर असेपर्यंतच त्याला सारे जाणून घेणे शक्य असते आणि आवश्यकही असते. तो विचारीत असतो, कोणी मारले, कोठे मारले, केव्हा मारले इ. हे सारे प्रश्न त्याला आणि त्याच्याबरोबरच्यांना त्रासदायक वाटतात, पण हे सारे प्रश्न तुम्हाला नकोसे, त्रासदायक वाटत असले तरी ते तपासाच्या दृष्टीने आवश्यक असतात. कारण ती केस कोर्टात जाणार असते. त्या वेळेस हेच सारे प्रश्न त्या अधिकाऱ्याला कोर्टाकडून, वकिलाकडून विचारले जाणार असतात.

**प्र. :** पण त्याच्यावर उपचार करणार की त्याला प्रश्न विचारून हैराण करणार ?

**उ. :** डॉक्टर उपचार करीतच असतात. आम्ही लिहिलेल्या स्टेटमेंटवर डॉक्टर 'हे सारे सागताना तो शुद्धीवर होता' एवढेच फक्त लिहिणार. त्यात काय लिहिले आहे त्याच्याशी त्या डॉक्टरांचा संबंध नसतो. तो ते सारे ऐकत असतो; पण तो त्याची सत्यासत्यता सागत नाही तो फक्त उपचार करतो. पोलीस विचारीत असताना त्या वेळेस हजर असणारे त्याच्याबरोबरचे इतर सारेजण म्हणत असतात 'कोणता प्रसंग आणि हे पोलीस बघा कसे प्रश्न विचारून छळताहेत त्या बिचाऱ्याला!' पोलीस त्या साऱ्याच्या रागाचे धनी बनतात. शेकडो प्रश्न आणि उपप्रश्न विचारून सत्य जाणून घेण्याचा प्रयत्न पोलीस करीत असतात त्यांना पटल्याशिवाय ते काहीच मान्य करीत नाहीत. कायद्यानेच त्याचे हात बाधले गेले आहेत.

**प्र :** पोलीस काहीच करीत नाहीत. ते निष्क्रिय आहेत त्याचे काय ?

**उ :** Inaction बद्दल पोलिसाना नेहमी दोष दिला जातो. त्याबद्दलची वस्तुस्थिती सागतो. पो. स्टेशनमध्ये ज्या तक्रारी येतात त्या दोन प्रकारच्या असतात : १. दखलपात्र (cognirable) आणि २. अदखलपात्र (Noncognnirable) आमच्या भाषेत N. C. त्याचे प्रमाण एक दखलपात्र तर चार N. C. असे असते. N. C. म्हणजे काय ? 'अ' ही बाई नळावर गेली. तिचे 'ब'शी नळाच्या पाण्यावरून भांडण झाले, मुलावरून झगडा झाला—असे अनेक तटेबखेडे, झगडे चाळीचाळीतून नित्य झडतात. ती माणसे चोकीवर येतात. 'ब'ने (वा 'अ'ने) दम दिला, झिज्या ओढल्या, त्याला पकडा तुरुंगात टाका असे ते तक्रारदार सांगतात. पोलीस सांगतात त्या भाडणात आम्ही काहीही करू शकत नाही. ही N. C. matter आहे. तुम्ही त्यासाठी कोर्टात जा. पोलिसखाते अशा घटनांची दखल घेऊ शकत नाही. त्यावर त्या साऱ्यांची प्रतिक्रिया अशी असते की, 'आम्ही आमची सारी कामे टाकून तुमच्याकडे आलो ते काय आम्हाला उद्योग नव्हता म्हणून की काय ? आम्ही आमचा मोलाचा वेळ घालविला, आम्हाला मारहाण झाली, शिव्या दिल्या तरीही तुम्ही त्याची दखल घेत नाही, हे काय आहे ? इथे कायद्याचे राज्य आहे की नाही ? पोलीस आम्हाला संरक्षण देत नाहीत म्हणजे काय ?' पोलीस दुसऱ्या पार्टीला पकडू शकत नाहीत, त्यांच्यावर आरोपपत्र लावू शकत नाहीत. कारण ती N. C. तक्रार असते. अशा ह्या केसेसमध्ये (ज्यांचे प्रमाण ७५%) आलेले तक्रारदार हे सारे पोलिसखात्याचे विरोधक बनतात. कारण ते असंतुष्ट असतात.

**प्र :** पण दखलपात्र गुन्हे घडतात त्या वेळीही पोलीस action घेत नाहीत. त्याच्या विभागात गुन्हे घडत नाहीत असे त्याना दाखवावयाचे असते. साखळीचोर, वाटमारे, घरफोडी करणारे, विनयभंग करणारे. मटका, दारूअड्डेवाले, गुड, दादागिरी करणारे इ. प्रकारचे लोक पोलिसांना ठाऊक असतात; पण त्यांच्याविरुद्धच्या केसेस ते नोदवूनच घेत नाहीत त्याचे काय ? ते अधिकारी टाळाटाळ करतात, दडपादडपी करतात त्याचे काय ?

**उ :** तुम्ही ज्या समाजविघातक (anti-social elements) व्यक्तीबद्दल बोलता त्याबद्दल सागतो. घडते असे—त्यांना आम्ही अटक करतो, ते जामीनावर सुटतात, दुसऱ्या केसमध्येही अडकतात. त्या

मंडळीना पोलिसखाते, कोर्ट, वकील इ बद्दल सामान्य माणसांपेक्षा जास्त माहिती असते. त्याचा या सान्याशी नित्य संबंध असतो. आरोपी म्हणून तो अनेक वेळा चौकीवर आला की, त्याला पेंडसे कसे आहेत, त्यांच्या हाताखालचे अधिकारी व पोलीस कसे आहेत, कसे वागतात, येतात केव्हा, जातात केव्हा हे सारे कळते, माहीत होते. अनेक जण तक्रारी घेऊन येतात. ते म्हणतात, 'तो अमुक तमुक दादा असे म्हणतो की, पेंडसे (वा इतर दुसरा) माझ्या खिशात आहेत, मी त्याना विकत घेतले आहे, ते माझे काहीही वाकडे करू शकणार नाहीत.' त्या दादाचे हे सांगणे सामान्यपणे सारे जण मान्य करतात, स्वीकारतात. त्याला टरकतात. 'I have purchased a police officer' हे Gospel truth मानतात आणि म्हणू लागतात 'आम्ही कसे त्या दादाला विरोध करणार? पोलीस तर त्याने विकत घेतले आहेत. मग आम्ही पामर काय करणार? आमचे आता कोण ऐकणार?' हे सारे का घडते तर तो गुड चौकीवर वारंवार येत असतो, अधिकाऱ्यांना भेटत असतो. बाहेर मात्र तो वेगळेच काही सांगत सुटतो आणि ते सारे खरे म्हणून सारे जण मानतात. एखाद-दुसऱ्या केसमध्ये 'खिशात घालणे' वगैरे नसेलच असे मी म्हणणार नाही; पण by and large तसे नसते. त्या दादालोकाना ठीक करण्यासाठी जो कायदा आहे तो (Ordinance Law of accused) कित्येक वेळा अपुरा पडतो. त्यामुळे आमचा नाइलाज होतो.

प्र : म्हणजे नेमके काय म्हणावयाचे आहे तुम्हाला? जरा स्पष्ट कराल तर बरे होईल.

उ : मुंबई पोलीस कायद्यात अशा सराईत गुन्हेगारांना तडीपार करण्याविषयी तरतूद आहे. त्यानुसार आम्ही त्या गुन्हेगाराविरुद्ध तक्रारी करणाऱ्याच्या साक्षी अगदी गुप्तपणाने घेऊन कारवाई करतो; पण अशा साक्षी देण्यासाठीच कोणी पुढे येत नाही. एखाद्या स्त्रीचा जर विनयभंग झाला, तिच्यावर बलात्कार झाला तर ती बाई कोर्टात जायला तयार नसते. कारण कोर्टात गेल्यानंतर उलटसुलट प्रश्न विचारले जाऊन आपली जाहीरपणे बेअब्रू होईल अशी भीती तिला वाटते. त्यामुळे, होते काय की, अशी कृत्ये करणारे करूनसवरून नामानिराळे राहतात. अशा घटना पुष्कळ घडतात. लोक म्हणतात अशा गुन्हेगाराविरुद्ध आम्ही कृती करीत नाही; पण आम्ही कोणती आणि कशी कृती करणार? आपल्या Indian Evidence Act प्रमाणे आरोपीने जरी पोलिसासमोर गुन्हा कबूल केला तरी त्याला काही अर्थच नसतो. त्याचा गुन्हा कोर्टात शाबीत होऊ शकत नाही. जोपर्यंत त्याच्याविरुद्ध पुरेसा पुरावा आणि साक्ष द्यायला साक्षीदार मिळत नाहीत तोपर्यंत त्याचा गुन्हा कोर्टात सिद्ध होऊ शकत नाही. तुम्ही असे नेहमी ऐकता आणि वाचता की, 'पुरेशा पुराव्याअभावी कोर्टाने आरोपीला सोडून दिले.' तो आरोपी सुटतो. कारण ती घटना, तो गुन्हा घडताना जे पाहणारे लोक असतात ते पुढे येत नाहीत. दिवसाढवळ्या भरबाजारात एकाचा खून झाला. त्या वेळेस शेकडो लोक ती घटना पाहात होते; परंतु एकही जण 'मी या माणसाला मारताना, हल्ला करताना पाहिले.' असे सांगायला पुढे आला नाही.

प्र : हे असे का घडते?

उ : लोक घाबरतात. त्यांना असे वाटते की, तो गुन्हेगार सुटला वा शिक्षा भोगून आला की सूड उगवेल, मला ठार मारील ही भीती त्याना वाटते किंवा कोर्टात दहा वेळा तारखा पडणार, आपल्याला वारंवार खेपा माराव्या लागणार. कोण ही दगदग करणार? म्हणून तो साक्ष देण्यास पुढे येत नाही कधी कधी काय घडते ते सांगतो एखाद्याचा खिसा कापला जातो. पाकिटासह खिसेकापू पकडला जातो. त्या पाकिटात असतात दोनशे रुपये. पाकिटाच्या मालकाला अनेक वेळा कोर्टात जावे लागते. तो वैतागतो. तो आरोपी या वैतागलेल्या आरोपीला सांगतो, 'कशाला तुम्ही या फंदात पडता? हे २०० रु. घ्या आणि मिटवा पाहू!' तो पैसे घेतो. कोर्टात सांगतो की, 'माझे पाकीट मारणारा माणूस हाच होता की काय हे मला आता काही आठवत नाही.' केस संपते. अशा अनेक केसेस घडतात. लोक म्हणायला तयार की, पोलिसांनी नीट तपास केला नाही, केस वीक ठेवली इ. आपल्याकडचा जो कायदा आहे त्याला भरपूर पुरावा हवा असतो. तो नसेल तर आरोपी सुटू शकतो. आज सर्वत्र दिसणाऱ्या मटक्याबद्दल सांगतो. आम्ही या 'मटका' अड्ड्यावर धाड घातली, आरोपीना पकडले तर ती केस कोर्टात उभी करण्यासाठी पंच लागतात. (प्रत्येक गुन्ह्याच्या तपासाच्या वेळी ते लागतात). पंचासमोर जे घडले ते याने कोर्टात सांगितले तरच ती केस उभी राहू शकते मटकेवाल्यांविरुद्ध तक्रार करणारा कोर्टात साक्ष द्यायला तयार नसतो. पंच मिळत नाहीत. मटका, दारू इ. बद्दलच्या केसेसमध्ये पोलिसाना support करायलाच कोणी मिळत नाही. कोर्ट केवळ पोलिसांच्या सांगण्यावर विसंबत नाही. कोर्टाला स्वतंत्र, नि:पक्षपाती, पोलिसांशी संबंध नसणारे साक्षीदार हवे असअसतात. आमच्या गप्पा चालू असतानाच पेंडसे यांच्याकडे एकजण तक्रार घेऊन आला. त्याच्या कॉलनीत चालणाऱ्या मटकाअड्ड्याबद्दलची तक्रार होती. ते सांगू लागले, 'मी त्या अमुक अ चौकीवर फोन करून श्री. ×× यांना सारी हकीगत सांगितली व आपण लक्ष घालून कारवाई करा, अशी विनंती केली. तो अधिकारी माझेच नावगाव विचारू लागला. माझे नाव सांगायला मी काय गाढव आहे काय? त्या मटकेवाल्याला तुम्ही मी तक्रार केली– माझे नाव सांगणार– म्हणजे मी मेलोच की!' त्यावर श्री. पेंडसे म्हणाले, 'तुमची भीती रास्त आहे; पण तुम्ही प्रत्येक अधिकाऱ्याबद्दल असा संशय घेणे बरे नाही. तुम्हाला कोठे तरी, कोणावर तरी विश्वास ठेवलाच पाहिजे. नाव सांगून सहकार्य दिले पाहिजे. प्रत्येक जण गुन्हेगाराला सामील झाला आहे. अगदी साध्या पोलिसापासून ते थेट कमीशनरपर्यंत असे समजणे हा पो. खात्यावर फार मोठा अन्याय आहे. (terribe injustice). पंच म्हणून कोणी तरी पुढे आल्याशिवाय एकही केस कोर्टात उभी राहू शकणार नाही. मटका, दारू, जुगार इ. अनेक गुन्ह्यात सामील असणारे गुन्हेगार साक्षीदारांअभावी सुटत आहेत हे समाज का लक्षात घेत नाही? पोलिसाना मदत करणे म्हणजेच स्वत:च्या सुरक्षिततेला सहाय्य करणे आहे. ते जर झाले नाही तर गुन्हे होणार आणि आम्ही काहीही करू शकणार नाही. पो. खाते हतबल ठरेल. प्रत्येक गुन्ह्याच्या वेळी वेगवेगळे पंच हवेत. तीच ती माणसे वारंवार साक्षीला येऊन चालणार नाहीत. कोर्ट असे म्हणेल की तुम्ही स्वत:ला वाचविण्यासाठी

पोलिसांनी तुमच्यावर खटले भरू नयेत म्हणून (बाजारपेठेत हमखास असणारे हातगाडीवाले, फेरीवाले इ.) तुम्ही पोलिसांना मदत करता, तुम्ही पोलिसाचीच माणसें आहात. कोर्टाचा असा समज झाला की, त्या साक्षीदाराची विश्वासार्हता नाहीशी होते. कोर्ट अशा पंचाची साक्ष ग्राह्य धरीत नाही. गुन्हेगार केवळ या कारणामुळेही सुटतो. पंच हा नि पक्षपाती, विश्वासू हवा आणि पोलिसांशी संबंधित असून चालत नाही, हे एक दुष्ट वर्तुळ आहे. पोलिसावर सामान्य माणसाचा विश्वास नाही, तो पोलिसाना मदत करायला पुढे येत नाही, पोलीस आपल्या ओळखीच्या माणसांना पंच म्हणून बोलावणार तर कोर्ट त्याच्यावर विश्वास ठेवणार नाही, गुन्हेगार मात्र सुटणार, गुन्हा करायला मोकळा होणार. हे दुष्ट वर्तुळ कोण तोडणार? असा माझा सवाल आहे. एक बोलके उदाहरण सागतो. एकावर खुनी हल्ला झाला. उपचार करणाऱ्या डॉक्टरांजवळ तो वारंवार सागत होता, 'पंजूने मुझे मारा,' 'पंजूने मुझे मारा.' पण डॉक्टरांनी हे आपल्या अहवालात लिहिले नाही. डॉक्टरांनी जर मरणकाळचे विधान म्हणून त्या खुन्याचे नाव ती व्यक्ती वारंवार घेत होती असे जर लिहिले असते तर आमचे काम किती तरी सुलभ झाले असते; पण M. B. B. S. झालेले डॉक्टरमहाशय जर सहकार्य करायला पुढे येत नाहीत-तर त्याला आम्ही काय करणार? ते डॉक्टर म्हणाले, 'off the record' सागेन, पण कोर्टात सागणार नाही की 'पंजूने मुझे मारा' असे तो म्हणाला. पो. अधिकाऱ्याला सांगून चालत नाही. डॉक्टराना हल्लेखोराचे नाव सांगितले नाही आणि पो. अधिकाऱ्यालाच फक्त सागितले असे होते. कोर्ट पो. अधिकाऱ्याचे सागणे ग्राह्य धरीत नाही. लोकाचा पाठिंबा पोलिसाना मिळत नाही. आरोपी सुटला की पोलीस खात्याला दोषी धरायला लोक तयार.

प्र.: कायदाही तुम्हाला हवा तसा नाही, लोकही तुम्हाला मदत करायला तयार नाहीत, तेव्हा पोलीसखात्याच्या शुद्धतेची तरी ग्वाही (clean chit) देता येईल काय?

उ.: clean chit असे म्हणू नका. पो. खाते हे काही रामराज्यातील खाते आहे असे मी म्हणणार नाही. समाजातले सारे जण काही रामराज्यातल्यासारखे आदर्श नाहीत. ते काही रामाचे अवतार नाहीत. या खात्यातील लोकही या समाजातूनच आलेले आहेत. ते काही बाहेरून आलेले नाहीत. आयात केलेले नाहीत. They are Part and parce of This society. या समाजात जे सद्‌गुण आणि दुर्गुण आहेत ते सारे या खात्यतही आहेत.

प्र.: पो. खात्यात शिरल्यानंतर हातात वारेमाप सत्ता येते. त्या सत्तेच्या जोरावर खूप कमावता येते, अरेरावी करता येते असे सांगणारे जे कोणी या समाजात आहेत तेच फक्त पो. खात्यात शिरतात असे मी म्हटले तर तुम्ही सहमत व्हाल का?

उ.: अजिबात नाही. तुम्ही म्हणता ते साफ चुकीचे आहे. एका पो. कॉन्स्टेबलच्या जागेसाठी दहा ते पंधरा जण अर्ज करतात. १०० जागा भरावयाच्या असतील तर किमान १५०० अर्ज येतात. आम्ही जर असे मानू लागलो, म्हणू लागलो की, हे सारे जण वाईटच गोष्टी साध्य करण्यासाठी खात्यात येतात तर ते अगदी अयोग्य ठरेल. पो. सबइन्सपेक्टराच्या १०० जागासाठी १००० जण अर्ज करतात त्यांची विविध प्रकारे परीक्षा (physical, intelligence etc.) घेतली जाते. त्याना वेगवेगळ्या चाचण्यांतून जावे लागते

प्र.: पो. सबइन्स्पेक्टरच्या निवडीत गैरव्यवहार (malpractice) होत नाही का?

उ.: Not at all. लेखी परीक्षेचा रेकॉर्ड असतो. शारीरिक तपासणी हा काही सिद्ध न करता येण्यासारखा प्रकार नाही. त्याची छाती, उंची पाहिली जाते. उंच उडी, लांब उडी मारता येते की नाही, खेळ येतात की नाही इ. पाहिले जाते. त्यात बदमाशी करता येणार नाही. नंतर होणाऱ्या मुलाखतीत त्याची एकूण क्षमता, लायकी अजमावली जाते. एखाद्या व्यक्तीच्या निवडीत मतभेद होतील पण ते किती प्रमाणात होतील? फरक दोन ते पाच टक्क्याचाच पडेल. अगदी नालायक आणि अत्युत्तम असा फरक पडणार नाही. मूर्ख आणि विद्वान इतका फरक पडणार नाही. आता तर ही निवड लोकसेवा आयोगाकडूनच होते. आयोग पक्षपातीपणे, गैरव्यवहार करून निवड करतो असे तुम्ही म्हणणार काय? प्रत्येक टप्प्याला, प्रत्येक संस्थेला जर आपण नावे ठेवू लागलो तर कसे होईल? लोकसेवा आयोग भ्रष्ट आहे, न्यायालये भ्रष्ट आहेत, अमुक भ्रष्ट, तमुक भ्रष्ट आहे असेच जर आपण म्हणू लागलो तर फारच पंचाईत होईल.

प्र.: आपल्या उत्तरांवरून आपण चागले वकील आहात, यशस्वी वकील झाला असता असे वाटते? तशी इच्छा होती काय?

उ: (प्रश्न आवडल्यामुळे मनापासून दाद देतात). प्रत्येक पो. अधिकाऱ्याला वकील असावेच लागते. कायद्याची पदवी जरी घेतली नसली तरी इतक्या वर्षांच्या (३७ वर्षे) अनुभवानंतर कायदे, न्यायालये आणि वकील यांच्याशी निकटचा संबंध आल्यानंतर माझ्यात वकिली गुण आहेत. असे तुम्हाला वाटणे साहजिकच आहे.

प्र.: तुमची इच्छा कोण व्हावे अशी होती?

उ.: इ. स. १९४० मध्ये मॅट्रिक झाल्यानंतर पुण्याच्या एस. पी. कॉलेजमध्ये मध्ये प्रवेश घेतला. त्या वेळेस माझी इच्छा विमानदलात जाण्याची होती. Armed force बद्दल मला आकर्षण होते. माझी निवड पोलीसखाते, विमानदल आणि Excise खाते अशा तीनही ठिकाणी झाली होती. मी मोठा मुलगा असल्यामुळे माझ्या वडिलांची इच्छा मी विमानदलात जाऊ नये अशी होती. पोलीस खात्यात तर नाहीच नाही. अर्थात मला त्यानी स्पष्टपणे नाही सागितले नाही. मला तर साहसाची वावड. मी पोलीसखाते निवडले. मनातून मात्र Armed force मध्ये जावे असेच सारखे वाटत होते.

प्र.: कोणकोत्या खेळात विशेष रस होता?

उ.: शाळेत-असताना (आणि कॉलेजमध्येही) विविध प्रकारच्या खेळांत भाग घेत असे. माझे हायस्कूलचे शिक्षण पनवेल येथे झाले. गावात त्या काळी (इ. स. १९४० अगोदर) हॉकी, क्रिकेट इ. सारखे खेळ खेळता येण्याजोगे मोठे मैदानच नव्हते. त्यामुळे ते खेळ खेळू शकलो नाही. सर्व देशी खेळामध्ये मी हिरीरीने भाग घेत असे. कॉलेजमध्ये असताना मी U. T. C. मध्ये (म्हणजे आजची N. C. C.) होतो. दुसऱ्या वर्षीच मी Corporal झालो मी 'Good Cadet' समजला जात असे. साहसाची आवड म्हणून इ. स. १९४३ मध्ये (इंटर झाल्यानंतर) पो. खात्यात P. S. I. म्हणून प्रवेश केला.

प्र: त्या वेळेस परिस्थिती कशी होती? तुम्ही राजकीय चळवळीत

भाग घेतला होता काय ?

उ. : त्यावेळेस सविनय कायदेभंगाची, चलेजावची चळवळ संपत आली होती. त्या चळवळीचा प्रत्येक तरुणावर परिणाम झाला होता. मीसुद्धा भाग घेतला होता. मलाही दोन-तीन दिवस अडकवून ठेवले होते. त्याची नोंद नव्हती म्हणून तर मला पो.खात्यात प्रवेश मिळाला, नाही तर या खात्यात माझा प्रवेश झालचा नसता ! (' खाते एका कर्तबगार अधिकाऱ्याला मुकले असते–' माझी प्रतिक्रिया). पिकेटिंग कसे करायचे, दगड कसे फेकायचे, पोलिसाना कसे चुकवायचे, सभा घ्यायच्या कशा, मोडायच्या, उधळायच्या कशा याचे तंत्र आणि मंत्र मला पूर्णपणे अवगत होते स्वातंत्र्य प्राप्तीच्या ईर्षेने सारेजण पेटले होते. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या वेळी जसा प्रत्येक मराठी माणूस प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे त्या चळवळीशी जोडला गेला होता त्याप्रमाणे त्या काळातले तरुण स्वातंत्र्य चळवळीकडे ओढले गेले होते. तारुण्याचे ते वैशिष्टयच असते. खात्यात आल्यानंतर पकडलेल्या राजबंद्याना सागत असे की तुमचे चवळीळचे सारे मार्ग मला ठाऊक आहेत. मी त्यात पारंगत आहे.

प्र. : तुमची अवस्था ' Between two flags ' अशी झाली काय ?

उ. : माझे P. S. I. चे शिक्षण १९४५ मध्ये संपले. त्या वेळेपासून स्वातंत्र्य मिळणार, स्वातंत्र्य आता अगदी दृष्टिपथात आले आहे असेच वातावरण होते. १९४६ मध्ये मी रितसर कामाला सुरुवात केली. त्या वेळेस साऱ्याच चळवळी थंडावत आल्या होत्या. स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले होते, Popular Cabinets ठिकठिकाणी स्थापन झाली होती. त्यामुळे प्रत्येकाला मनोमन असे वाटू लागले होते की, थोडयाच दिवसात आपण स्वतंत्र होणार ! त्यामुळे तिरंगा की युनियन जॅक असा पेच माझ्या मनात निर्माण झाला नाही. कॉलेजमध्ये मी पायजमा, नेहरूशर्ट अशा वेषात जात असे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर होणाऱ्या सभांना गणवेष घालून जाणे आवश्यक नसे. त्या वेळेसही माझा पोशाख पायजमा, नेहरू शर्ट असाच असे. त्यामुळे असा पोशाख वापरणारे आम्ही पो. अधिकारी फार पॉप्युलर झालो. आमच्या अगोदरच्या पिढीतले अधिकारी होते त्यांना मात्र पाढरी टोपी डोक्यावर ठेवताना जरा चमत्कारिक वाटत असे. पांढरी टोपी कशी वापरायची असे त्याना वाटे. त्यामुळे त्यांना बदललेल्या परिस्थितीशी चटकन जुळवून घेता आले नाही, उलट आम्ही तरुण मात्र त्यातलेच असल्यामुळे चट्कन रुळलो, mix झालो, popular झालो.

प्र. : तुमचा या पेशाकडे पाहण्याचा दृष्टिकोन कोणता आहे ? तुम्ही काय करता ?

उ. : स्वातंत्र्य असो वा नसो, तुम्ही लोकांसाठी काही तरी करू शकता, करणे हे महत्त्वाचे आहे. या खात्यात असल्यामुळे केवळ गुन्हे शोधणे, कायदा, सुव्यवस्था राखणे एवढेच काम असते असे नाही. आम्ही कुटुंबे जोडू शकतो. पति-पत्नीच्या भाडणात समझोता घडवून आणण्यासाठी आम्हाला नाटकेही करावी लागतात. त्याचे खाजगी झगडे आमच्यापुढे येतात त्या वेळेस एकाला रागवायचे, दुसऱ्याला चुचकारायचे; पण त्याना एकत्र ठेवायचे, असे करावे लागते. अशा प्रसंगी आम्ही पो. अधिकारीच नसतो, तर आम्हाला न्यायाधिशाची भूमिकाही पार पाडावी लागते. अहो तुम्हाला कल्पनाही येणार नाही की कशाकशासाठी लोक आमच्याकडे येतात ते. पती-पत्नीची भाडणे, मुलांचे गैरवर्तन, पित्याचे, कर्त्या पुरुषाचे दुर्वर्तन इ. अनेक प्रकरणात केवळ पो. अधिकारी म्हणून नव्हे, तर न्यायाधीश म्हणून शांतपणे दोन्ही बाजू ऐकून घेण्याचे, समजूत घालण्याचे, निवाडा देण्याचे काम करावे लागते. आमच्या खात्याचा नैतिक प्रभाव पडतो. त्यामुळे आम्ही लोकाची दारूसारखी व्यसने, जुगारासारखे नाद दूर करू शकतो. कौटुंबिक नाती ही रेशमासारखी नाजूक धाग्यांनी जोडलेली असतात. त्या नात्यात बेबनाव झाला तर तशाच नाजूक हातांनी तो गुता सोडवावा लागतो. ही नाती तुटता कामा नयेत, त्यातून काही वाईट निष्पन्न होऊ नये म्हणून अती खबरदारीने काम करावे लागते.

प्र : मुली पळून जातात, मुले पळवली जातात तेव्हा तुम्ही काय करता ?

उ. : मुली पळून जातात, वाईट सगतीला लागतात, त्याना कुमार्गाला लावण्याचा प्रयत्न करावा लागतो. कधीकधी पालकाच्यासमोर त्या मुलीशी रौद्रावतार धारण करून बोलावे लागते कधीकधी दोन थोबाडीतही (अर्थात पालकासमोर) द्याव्या लागतात. पालक आमचे आभार मानतात. ते म्हणतात, ' तुम्ही मारलेत म्हणून तर ती ठिकाणावर आली. आमचे कोणाचेच ती ऐकत नव्हती. तुमचे अनंत उपकार आहेत आमच्यावर ! आम्हाला जे करता आले नाही, करता येणे शक्य नाही ते तुम्ही केलेत. तुमचे कधीही उपकार विसरणार नाही ! ' या उद्गारावरून तुम्ही काय ते समजा. मुले पळून जातात की पळविली जातात ? जरा जाणती मुले नेहमीच असे सागतात की ' एका दाढीवाल्याने पळवून नेले, मी मद्रासमध्ये (वा इतर कोणत्या तरी लांबच्या शहाराचे नाव) जागा झालो.' अशी गोष्ट सागतात. खरे असे असते की, घरून नेलेले सगळे पैसे संपलेले तरी असतात किंवा गमावून बसलेले असतात. त्या मुलांची अशी कपोलकल्पित कथा ऐकल्यानंतर आम्ही त्यांना विचारतो ' खरे साग कोठे गेला होतास ? कोणत्या अड्डयावर पैसे गमावलेस, कोठे शेण खाल्लेस इ. ' आपली डाळ आता शिजत नाही असे वाटल्यानंतर खरी हकीकत बाहेर येते.

प्र. : या मुला-मुलीचे पालक जेव्हा आपला आनंद, कृतज्ञता व्यक्त करतात तेव्हा काय वाटते ?

उ. : अर्थात बरे वाटते. हा गणवेष आपण समाजहितासाठी चढविला आहे, त्याचे सार्थक होत आहे याबद्दल आनंद आणि अभिमान जरूर वाटतो.

प्र. : असेच समाधान देणारा एखादा ठळक प्रसग आठवतो का ?

उ. : ते दिवस संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे (इ. स १९५६) होते. बंदुकीच्या गोळयांचा वर्षाव, अश्रुधुराच्या नळकांडयाची जबरदस्त बरसात, तंग वातावरण, सर्वत्र कर्फ्यू पुकारलेला. सगळीकडे स्मशानशांतता पसरलेली आणि मी बंदोबस्तासाठी जीपमधून चाललो होतो. इतक्यात त्या साऱ्या वातावरणाला तडा जाणारा आवाज–' मी कर्फ्यू मोडला, मला गोळया घाला, माझा नाइलाज आहे ' असे शब्द माझ्या कानावर पडले. मी जीप थाबविण्यास सागितले नि वळून पाहिल्यानतर असे दिसले की एक प्रौढ इसम, धोतर आणि सदरा अशा पोशाखातला, वरील शब्द उच्चारीत जीपसमोर उभा होता. मी त्याला जवळ

बोलावले. त्याला विचारले, 'बोला, काय गडबड आहे?' तो सांगू लागला, 'तुम्ही मला गोळ्या घाला, पकडून न्या, माझे काय वाट्टेल ते करा पण माझी एक विनंती ऐका!' जो माणूस कर्फ्यू मोडून, पोलिसांची जीप अडवितो, त्या अर्थी त्याचे नक्कीच काही तरी फार बिनसले असावे, तो फार मोठ्या अडचणीत सापडला असावा असे मला मनोमन वाटले. त्याला आपण मदत केलीच पाहिजे असे ठरविले. तो पुढे सांगू लागला, 'साहेब, माझी मुलगी प्रसूतीच्या वेदनांनी तळमळते आहे, ती अडली आहे, तिला जर वेळीच वैद्यकीय मदत मिळाली नाही तर ती मरेल हो! या अशा वेळी डॉक्टर काही येऊ शकणार नाहीत. तुम्हीच मला मदत करू शकाल. माझ्या मुलीला हॉस्पिटलमध्ये न्या हो!' मी जीप मागे घेतली. साऱ्या पोलिसांना खाली उतरविले. त्या मुलीला अलगद जीपमध्ये घालून हॉस्पिटलमध्ये नेले. तो माणूस नातू झाला म्हणून नंतर पेढे घेऊन आला. वास्तविक ते तेथेच संपायला हवे होते; पण तो माणूस आजपर्यंत माझ्याकडे नियमितपणे येतो. अधूनमधून तो मुलगाही येतो मी त्याला एकदा म्हटले तर तो म्हणाला, 'तुम्ही माझ्यावर अनंत उपकार केले आहेत. मी तुम्हाला कसा बरे विसरेन?' असे एक ना अनेक प्रसंग आमच्या आयुष्यात घडतात. असे अनेकजण कृतज्ञतेच्या भावनेने माझ्याकडे नेहमी येतात. मी माझे कर्तव्य करतो आहे याचे समाधान मला वाटते.

प्र. : हा प्रसंग होता तुमच्या गणवेषाआड (ज्ञात) असणाऱ्या माणसाचा. तुम्ही गुन्हे शोधताना आलेला एखादा अविस्मरणीय प्रसंग सांगाल काय? तुम्हाला जी पदके मिळाली ती अशाच प्रसंगांमुळे मिळाली का?

उ. : प्रथम मला पदके कोणती आणि का मिळाली ते सांगतो. गुन्हे शोधणे, कर्तव्य बजावणे आणि ही पदके याचा साक्षात संबंध आहेच. त्यावर तर आमची योग्यता पारखली जाते. मला पहिले पदक मिळाले इ. स. १९६६ मध्ये, 'Indian Police Medal' for Meritorious and distinctive Services साठी. इ.स.१९४५ ते इ. स. १९६६ या कालावधीत मी जे काम केले त्याची पावती या पदकाद्वारे मिळाली. दुसरे पदक मिळाले इ. स. १९६८ मध्ये. मुख्यमंत्र्याचे सुवर्णपदक. महाराष्ट्रातील त्या वर्षीची उत्कृष्ट केस शोधली म्हणून ते मिळाले. तिसरे पदक मिळाले गेल्याच वर्षी. (इ. स. १९८०). ते राष्ट्रपतिपदक. ज्याला पोलीसपदक (१ ले) मिळते त्यालाच हे पदक देतात. तुमच्या भाषेत सांगावयाचे म्हणजे I. P. Medal म्हणजे पदवी (B. A.) परीक्षा तर राष्ट्रपतिपदक म्हणजे M. A. ची पदवी. B. A. झाल्याशिवाय M. A. होता येत नाही ना?

प्र. : आपण दुसरे पदक उत्कृष्ट केस शोधण्यासाठी मिळाले म्हणून म्हणालात. त्याबद्दल जरा सांगता काय?

उ. : दरवर्षी उत्कृष्ट तपासासाठी (Investigation) पदक असते. एखाद्या महत्त्वाच्या केसचा शोध, तपास लावणे, ती केस कोर्टासमोर ठेवणे, कोर्टाने त्याबद्दल चांगले उद्गार काढणे, ती सिद्ध होणे इ. साठी (हे काम ज्याने यशस्वीरीत्या केले त्याला) दिले जाते. विविध खातेप्रमुखांच्या समितीसमोर त्या वर्षीच्या सगळ्या केसेस ठेवल्या जातात. ती समिती वर दिलेले निकष लावून एका केसची, ती केस तपासणाऱ्या अधिकाऱ्याची निवड करते.

प्र. : ज्या केसमुळे तुम्हाला मुख्यमंत्र्याचे सुवर्णपदक मिळाले त्या केसची सविस्तर हकीगत ऐकायला मला आवडेल.

उ. : इ. स. १९६८ मध्ये एक कारखानदार आपले दोन लाख रुपये गोडाउनमधून चोरीला गेले अशी तक्रार घेऊन आला. ती रक्कम त्याने तीन महिन्यापूर्वी ठेवली होती. त्यानंतर त्या पैशांची गरज न लागल्यामुळे तिकडे त्याचे लक्षच गेले नव्हते. त्यामुळे या तीन महिन्यांच्या काळात ते पैसे कोणी आणि केव्हा नेले हे सांगणे केवळ अशक्य होते. कोणताच पुरावा उपलब्ध नव्हता. तपासाचे काम माझ्याकडे आले. त्याचे गोडाउन शिवडी येथे होते.

प्र. : तुम्ही त्याला विलंबाचे कारण विचारलेत काय? दम दिलात काय? धुडकावून लावण्याचा प्रयत्न केलात काय? कशाला ही डोकेदुखी असे म्हणालात काय?

उ. : मी प्रथमच त्याला Causes for delay विचारले. मी त्याला फायर केले नाही. मी तसे कधीही करीत नाही. एखादी व्यक्ती तक्रार घेऊन येते याचा अर्थच असा की त्याच्याकडे–तिच्याकडे काही तरी घडले आहे. तो सिनेमा पाहण्यासाठी थिएटरवर जातो तसा आमच्याकडे येत नाही. मी नव्या तरुण अधिकाऱ्यांना सांगतो–'आपल्याकडे आलेला माणूस पेशंट आहे असे समजून त्याला वागवा. सत्यता—असत्यता पडताळा. Give a human touch to every problem and person.' ज्यांच्या केसेस detect झाल्या नाहीत असे अनेकजण माझे मित्र झाले आहेत. मी काही परमेश्वर नाही हे त्यांना कळते. प्रयत्न करणे माझे काम आहे. माझ्या कामात मी कुचराई करीत नाही.

प्र. : पुढे काय झाले?

उ. : शिवडी येथील गोडाउनमध्ये जाऊन चौकशीस सुरुवात केली. गोडाउनचा पहारेकरी आणि तेथे काम करणारे कामगार यांच्याकडे चौकशीस प्रारंभ केला ज्यांच्या जाब–जबाबामुळे संशय आला त्यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे तीस-पस्तीस हजाराची रोकड मिळाली. त्यामुळे संशय बळावला. अधिक चौकशीअंती असे कळले की ती रक्कम त्यांच्या गोडाउनमधील साड्या चोरून विकल्या (एकूण साडीचोरी दीड लाख रुपयांची) त्यातली होती. या चोरीची कल्पनाच त्या मालकाला नव्हती. ती चोरी त्याच्या लक्षात कधीच नव्हती. मूळ चोरीचा पत्ता लागला नाही, त्याच्याकडून धागा–दोराही हाताला लागला नाही; पण दुसरीच चोरी उघडकीस आली. आम्ही बुचकळ्यात पडलो. तपास आणि विचार चालूच होता. दरम्यान आचार्य अत्रे यांचे 'भेटीला या' असे पत्र मला आले. आचार्यांचा त्या काळातला दबदबा तुम्हाला ठाऊकच आहे. मी त्यांच्याकडे गेलो. त्यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीत (ते कसे हे पेंडशानी साभिनय दाखविले.) मला बजावले 'तुम्ही काही निरपराध, गरीब कामगारांना छळत आहात, त्यांना मारहाणही करता असे ऐकले. हे असे चालणार नाही. ते माझे मतदार आहेत. गाठ माझ्याशी आहे हे विसरू नका!' मी त्यांना म्हटले, 'अत्रेसाहेब, आपल्याला त्याबद्दल काही माहिती आहे काय?' 'मला माहीत नसणार मग कोणाला असणार? ती माणसे माझ्या मतदारसंघातील आहेत!' ('न सुटणाऱ्या गुन्ह्याला राजकीय रंग चढला' माझी

प्रतिक्रिया). 'तुम्हाला प्रत्यक्ष काय घडले सांगतो.'

मी त्याना इत्थभूत सारे काही सागितले. ते आश्चर्याने जवळ-जवळ ओरडूनच म्हणाले, 'काय म्हणता काय, तुम्हाला त्यांच्याकडे ३०–३५ हजार रुपये रोख मिळाले ? अहो, माझ्याकडे २–५हजारही मिळणार नाहीत. काय चोर, हरामखोर लोक आहेत हे ! व्यवस्थित करा साल्यांना !' 'माझी ती पद्धत नाही.' आचार्यांनी ज्या तातडीने मला पत्र लिहिले तेवढ्याच आवेशाने, सत्य समजल्यावर त्यांना शिव्याही दिल्या! 'Open hearted man, no doubt!' मी त्यांचा निरोप घेताना म्हटले 'एका महत्त्वाच्या आणि चक्रावून टाकणाऱ्या चोरीचा तपास मी करीत आहे. आपले आशीर्वाद हवेत मला.' त्यानी मला तोंडभरून आशीर्वाद दिला आणि यश मिळेल अशी ग्वाही दिली. मला समज देण्यासाठी त्यानी बोलावले होते; पण मी त्याचे-कडून शाबासकी आणि आशीर्वाद घेऊन बाहेर पडलो. माझ्या तपासात मला असे आढळून आले की, रामलाल यादव नावाचा एक भय्या चौकीदार म्हणून गोडाउनमध्ये (शिवडीला) होता. तो काही दिवसापूर्वी नोकरी सोडून गेल्याचे कोणीच सागितले नव्हते, जाताना मालकाने त्याला प्रामाणिकपणाबद्दल प्रशस्तीपत्रकही दिले होते. मालकाजवळ रामलालचा पत्ता नव्हता. तो वारंवार त्याची स्तुतीही करीत होता. मी पत्ता मिळविण्यासाठी भविष्यनिर्वाह निधी आयुक्तांच्या कार्यालयात गेलो. तेथील कागदपत्र जळले होते. त्यातून एक तुकडा मिळाला. त्या तुकड्यावर 'रामलाल यादव, रुद्रगड नवासी, जि. गोंडा' एवढा पत्ता मिळाला. हा जिल्हा उत्तर प्रदेशात आहे. आम्ही तिकडे गेलो. त्याला पकडले. त्याने मी निरपराधी आहे, माझ्याजवळ मालकाने दिलेले प्रामाणिकपणाचे शिफारसपत्र आहे इ. सागितले. तो काही कबूल होईना !

प्र : तुम्ही त्याला साधेपणाने, सरळ विचारले की थर्ड डिग्रीचा वापर केलात ? मारहाण केलीत काय ?

उ : तुम्हाला सागतो हा जो मारहाणीचा मार्ग आहे तो मला बिलकूल मान्य नाही, पसंत नाही. माझा त्या मार्गावर विश्वास नाही. जे अट्टल गुड असतात त्याच्याशी वागताना सवाईगुड व्हावे लागते; पण रामलालसारखे जे अपराधी असतात त्यांच्याशी वेगळ्या तऱ्हेने वागावे लागते. त्याना मारहाण करावी लागते हे निखालस चूक आहे. अशा गुन्ह्यांचा शोध मारहाण करून लागत नाही. त्यासाठी फार कौशल्याने वागावे लागते. psychological treatment चा वापर करावा लागतो. त्याला प्रश्न विचारून, सतत त्याच्याशी बोलून त्याच्याकडून काढून घ्यावे लागते. तुम्ही विश्वास ठेवणार नाही, पण सागतो. रामन राघवनसारखा, ज्याने ४३ खून केले त्याच्याशी आम्ही सतत तीन दिवस बोलत होतो. त्याच्या अंगाला हातही लावला नाही. सतत Interrogatioe & questioning केले. ३ दिवसानंतर 'He came out with entire truth'

प्र : मी तुमच्यासमोर एक सात वर्षांचा मुलगा आणून उभा करतो. पोलिसानी त्याला इतकी मारहाण केली की त्याला उठता बसता येणे अशक्य झाले. याला तुम्ही काय म्हणणार ?

उ : हे अगदी अमानुष (inhuman) आहे. असे घडायला नको होते. खाते त्या पोलिसावर action घेईल.

प्र : आपला अनुभव बाजूलाच राहिला. गोंडा विभागातील पोलिसाचे सहकार्य कितपत मिळाले ?

उ : रामलालचे राहण्याचे ठिकाण नेपाळ–हद्दीपासून तीन मैलावर आहे. गोंडा या जिल्ह्याच्या ठिकाणापासून दीडशे मैलावर आहे. त्या जिल्ह्याचे डेप्यु. सुप. ऑफ पुलीस म्हणाले 'पेडसेसाब आप बंबईसे यहा आये हो। एक बात खयालमें रखना, बंबईसे यहा पैसा आता है। यहाँसे बंबई (पैसा) वापस नही जाता.' ते आणखी म्हणाले, 'आपको मालूम है, इस जिलेका नाम गोंडा क्यूँ है ? इसलिए गोडा कहते हैं की यहाँकी सारी आबादी गुडोकी है।' तिथल्या पोलीस अधिकाऱ्याशी झालेली ही बातचीत लक्षात ठेवा.

प्र मी हे सारे लिहू का ?

उ : अगदी बेलाशक लिहा! Point blank, no objection.

प्र : त्या अधिकाऱ्याच्या थोबाडीत द्यावी असे वाटते का ? 'तू परिधान केलेल्या गणवेशाचा अपमान करतो आहेस', असे सागावेस वाटले का ?

उ : मी त्याला काहीही म्हटले नाही किंवा त्याच्या थोबाडीत मारावी असेही वाटले नाही. उपयोग काय ? मनाशी खूणगाठ बाधली की परिस्थिती ही अशी आहे. या अशा प्रतिकूल परिस्थितीतून आपल्याला चौकशी करायची आहे. तपासात प्रगती कशी होईल इकडेच माझे लक्ष असते.अशा अनुपयुक्त गोष्टींना मी थारा देत नाही. मी तपासाला सुरुवात केली. पहिल्या तपासात आम्हाला सुमारे दीड लाख रुपये मिळाले. आम्हाला बरे वाटले. ती रक्कम डब्यात ठेवून भिंतीत लपविली होती. मिळालेल्या पैशाबद्दल आनंद होता त्यापेक्षा न मिळालेल्या पैशांची विवंचना अधिक होती. आमच्या-बरोबर फिर्यादीही आला होता. रामलालने उरलेले पैसे मुबईत आहेत असे सागितल्याचे त्याने ऐकले होते. चोरी झालेल्या सर्व पैशांचा हिशेब लागलाच पाहिजे तरच तो खरा तपास! आम्ही मुबईला जाण्याची तयारी सुरू केली. लखनौला मी, हवालदार व आरोपी हॉटेलात बसलो होतो. दुसरे दोन अधिकारी तिकिटे काढायला गेले होते. आरोपीकडून काढून घ्यायचे असेल तर मानसशास्त्राचा वापर करावा लागतो. 'you must go to his level.' त्याच्याशी जवळीक साधली पाहिजे. मी हवालदाराला म्हटले, 'काय हवालदार, बिडीकाडी काही आहे की नाही? काढा की!' त्याने दिलेल्या बंडलातून एक विडी आरोपीला दिली, एक हवालदाराला दिली व एक मी घेतली. विड्या पेटवून आम्ही धूर काढू लागलो. विडी ओढता ओढता अगदी सहजपणे त्याला विचारले. 'सच बोलो पैसा किधर है' त्याने ते पैसे घरीच असल्याचे सागितले. ते घराच्या पाख्यात एका पुरचुडीत ठेवल्याचे त्याने कबूल केले. ती जागा फक्त त्याच्या बायकोलाच ठाऊक होती. मुबईवारी रद्द करून आम्ही परत रुद्रगडला गेलो. जाताना मनात अनंत विचार येत होते. प्रदेश गुडांचा, जवळ मोठी रक्कम, पायवाटेने जायचे. गावातल्या जमावाने हल्ला केला तर ? आम्ही हत्यारबंद असलो तरी आम्हाला over-power करणे सहज शक्य होते. घरात गेल्यावर त्याने त्या विशिष्ट ठिकाणी हात घातला आणि हात बाहेर काढून तो ओरडू लागला 'बडा जुल्म हो गया. चोरीका चोरी हो गया' रामलालच्या बायकोला–सीतेलाही विचारले. तिने काहीही ठाऊक नसल्याचे सागितले. All possible excuses were given. माझ्यापुढे प्रश्न पडला आता

काय करायचे ? कारण चोरी झाली, आरोपी पकडला की प्रत्येक पैशाचा हिशेब मिळालाच पाहिजे. आरोपीने जर बाई, बाटली, जुगार खाणे इ. वर उधळले असतील तर तेही त्याने सांगितले पाहिजे. साऱ्या खर्चाचा पटण्याइतपत हिशेब त्याने दिला आणि तो हिशेब बरोबर असला तरच ते perfect investigation. आत धुडाळले, चौकशी केली; पण हातात काही आले नाही. बाहेर येऊन बसलो. माझ्याभोवती चार-पाच पोरे जमा झाली. माझ्याजवळ बाहेर पडताना चॉकलेट, गोळ्या असतात. तपास करीत फिरताना विरंगुळा म्हणून तोंडात टाकण्यासाठी त्यांचा उपयोग होतो. त्या गोळ्या त्या पोरांना वाटल्या. त्यांची शाळा, अभ्यास, खेळ इ. बद्दल गप्पा मारायला लागलो. मुले बोलू लागली. बोलण्याच्या ओघात त्यांपैकी एकाला विचारले की, ते पैशांचे बंडल कोठे गेले ? त्याने निरागसपणे सांगितले, 'चाचीने निकालकर अंदर रख्खा है !' त्याने जी जागा सांगितली ती पाहण्यासाठी आत गेलो. शिडीवरून चढून आत हात घातला. हाताला पुरचुंडी लागली. त्यात ४२००० रु. मिळाले. हिशोबाप्रमाणे २४००–२३०० रु. कमी होते. त्याने ते खर्च केले होते. त्याने इतक्या दिवसात इतकी कमी रक्कम खर्च केली होती त्यावरून तो जातिवंत गुन्हेगार नव्हता, त्याचा हा पुरावाच होता. जे criminal असतात ते हातात आलेला पैसा बाई, बाटली, जुगार, बिर्याणी, चिकन इ. वर अगदी मनसोक्त उधळतात. अगदीच बुळा भय्या तो. त्याला एक नोट मोडून आणण्याची पंचाईत. मी त्याला विचारले हे सारे पैसे किती आहेत हे ठाऊक आहे का ? तो म्हणाला, साहेब, मला मोजता कोठे येते ? आपण चोरलेली रक्कम दोन लाखाची आहे हे त्याला ठाऊकच नव्हते. तो म्हणाला, 'जेव्हा मी पेटी उघडून ते पैसे पाहिले तेव्हा माझे डोळे दिपूनच गेले !' खूप पैसे आहेत एवढेच त्याला कळले. १०० नोटा मोजून हिशोब करणे त्याच्या कुवतीबाहेरचे होते. कोणताही प्रसंग न पडता सारा मुद्देमाल घेऊन मुबईस आलो. रीतसर कोर्टात आरोपपत्र दाखल केले. त्यानंतर मी आचार्य अत्र्यांना फोन करून सर्व हकीकत सांगितली. ते म्हणाले, 'अशीच जनहिताची कामे करीत जा, असेच यश मिळवा. माझे आशीर्वाद आहेत तुम्हाला !' आचार्य म्हणजे खिलाडूपणाचा आदर्श नमुना होता ! या केसबद्दल हे पदक मिळाले. खात्याने माझ्या कामाची प्रशंसा करून दिलेली जवळजवळ ६०० प्रमाणपत्रे माझ्याजवळ आहेत. राष्ट्रपतींचे पदक मिळविणारे महाराष्ट्राबाहेरचे सारे जण (एखाद दुसरा अपवाद वगळता) माझ्यापेक्षा वरच्या श्रेणीतले आहेत.

प्र : तुमचे प्राण धोक्यात आले, जीवावर बेतले, अशी एखादी घटना घडली का ?

उ : तसे आजपर्यंत चार-पाच प्रसंग घडले. एकदा असे झाले. त्या वेळेस मी दारुबंदीखात्यात काम करीत होतो. आम्हाला अशी खबर मिळाली की, माहिमच्या एका बाजूला 'ब्यूक आठ 'मधून दारू येणार आहे. त्या विभागात टॅक्सीने, कारमधून दारूची ने-आण चालते असा आमचा संशय होताच. आम्ही पूर्ण तयारीने गेलो. एका बाजूला जीपमध्ये बसलो. मध्यरात्रीनंतर ब्यूक ८ ही गाडी आली. थांबण्याचे इशारे करूनही ती गाडी थांबली नाही. आम्ही पाठलागाला सुरुवात केली. मला ड्रायव्हिंगची हौस असल्यामुळे जीप चालविण्याचा खास परवाना मी घेतला होता. मीच जीप चालवीत होतो. ड्रायव्हर बाजूला बसला होता व चार पोलीस मागे बसले होते. ती गाडी शिवाजी पार्क, पोर्तुगीज चर्च, वरळी, लोटस सिनेमा अशा मार्गाने चर्नीरोड स्टेशनजवळील मोठ्या पेट्रोलपंपापर्यंत आली. पाठलाग चालू असताना मी रिव्हॉल्व्हरने फायरिंग केले; पण उपयोग झाला नाही. ती गाडी पंपाजवळून त्याने वळवली आणि पुन्हा आल्या मार्गाने तो परत जाऊ लागला. गाडी माहीमवरून हायवेकडे वळणार होती; परंतु वाटेत दोन बैलगाड्या आडव्या आल्या. त्याने गाडीचा वेग कमी केला. आता जर ही संधी साधली नाही तर ती गाडी हाताला लागणार नाही असे वाटून, मी बेभान होऊन, काहीही होवो असा निश्चय करून, त्या गाडीच्या डाव्या बाजूने माझी जीप त्याच्या गाडीपुढे तिरकी उभी केली. त्या पठ्ठ्याने माझ्या जीपवर जोरात धडक दिली. ब्यूक ८ म्हणजे हत्तीसारखे धूड. त्या धक्क्याने माझी गाडी उलटी झाली. मी पुरता अडकलो. माझ्या ड्रायव्हरला व शिपायांना असे वाटले की, आपले साहेब बेशुद्ध तरी झाले असावेत किंवा ठार तरी झाले असावेत ! काय करावे हे त्यांना सुचेना. मी तसाच त्या चमत्कारिक, अवघडलेल्या, मार लागलेल्या अवस्थेत ओरडलो 'अरे त्या गाडीची इग्नीशान चावी काढून घ्या !' त्यांनी बाहेर येऊन गाडीची चावी ताब्यात घेतली व आरोपींना ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. त्यांनी (ड्रायव्हर पारसी होता व दुसरा उत्तर प्रदेशी होता), पोलिसांवर हात उगारला, त्याचा पोलिसांनीही प्रतिकार केला. त्यांची जुगलबंदी सुरू झाली. मी कसाबसा बाहेर आलो व ती झटापट थांबविण्याचा प्रयत्न करू लागलो. कारण त्यात ते आरोपी जर जखमी झाले असते तर पंचाईत झाली असती. त्या गाडीमध्ये ४ गॅलनचे–रॉकेलचे असतात तसे–४२–४३ डबे दारूने भरलेले होते. दोन्ही आरोपींना जीपमध्ये बसविले. जीप दिली ड्रायव्हरच्या ताब्यात आणि मी सुरू केली ब्यूक ८. आमचा लवाजमा बोरीबंदरजवळील आमच्या चौकीवर आला. आम्ही लगेच सेंट जॉर्ज इस्पितळात गेलो. माझी व ड्रायव्हरची वैद्यकीय तपासणी झाली. उपचार झाले, मुका मार लागला होता. सुदैवाने जखम किंवा फ्रॅक्चर झाले नव्हते. ही बातमी त्या वेळचे महामंत्री बाळासाहेब देसाई यांना कळली. त्यांनी आम्हा सर्वांना बोलावून शाबासकी दिली. अशा तऱ्हेने एका चित्तथरारक पाठलागातून, जीवावर बेतले असताना मी बचावलो.

प्र. : ज्यामुळे तुमची नोकरी जाईल, तुमचे नाव खराब होईल अशा तऱ्हेचे एखादे बालंट आरोप वगैरे आला होता काय ?

उ. : इ. स. १९७७ मध्ये आणीबाणी संपून काही महिने उलटल्यानंतर (लगेच नाही) प्रा. देबनाथन यांनी माझ्याविरुद्ध तक्रार केली की 'सुरेश पेडसे व त्याच्या इतर मदतनिसांनी मिळून मला अटकेत असताना जबरदस्त मारहाण केली. कारण मी नक्षलवादी आहे, घातपाती आहे.' प्रा. देबनायन, त्यांच्या पत्नी, त्यांचे इतर नातेवाईक हे समाजातील वरिष्ठ थरातील, उच्चपदस्थ असल्यामुळे या तक्रारीचा खूप गवगवा झाला. त्यांनी आपली केस कोर्टात नेली नाही. शहा कमिशनपुढे नेण्याचा आग्रह धरला. मॅजिस्ट्रेटसमोरही त्यांनी मारहाणीची तक्रार केली नव्हती. आम्हा सर्व संबंधित अधिकाऱ्यांवर सस्पेन्शनची टांगती तलवार लटकत होती. खात्याने एका ज्येष्ठ आ. ए. एस. अधिकाऱ्याकरवी कसून, संपूर्ण चौकशी

केली. त्यानी 'सारे आरोप निखालस खोटे' असल्याचा निर्णय दिला. खात्याने कोणतीही कारवाई न करण्याचा निर्णय घेतला. 'अगा जे घडलेचि नाही' त्यात मी अडकलो; पण निर्दोष सुटलो. माझा मारहाण करण्यावर विश्वास नाही. मी गुन्हेगारांनाही हात लावत नाही, तेथे एका बुद्धिमान प्राध्यापकाला अशी अमानुष वागणूक कदापी देणार नाही, देणे शक्य नाही. माझ्या जीवनातला तो काळ म्हणजे एखाद्या भयानक काळरात्रीसारखा होता!

प्र : आपल्याला संगीत, वाचन, सामाजिक कार्य इ. मध्ये रस आहे काय ?

उ : मला संगीताची, त्यातल्या त्यात नाटयसंगीताची आवड आहे गाण्याच्या बैठकीना वेळ मिळाला की आवर्जून जातो. वाचन करायला हवी तशी सवडच मिळाली नाही. परंतु गुन्हे, गुन्हेगार इ. वरचे ग्रंथ मासिके वाचतो क्वचित नाटक, सिनेमा पाहतो.

प्र. : 'घाशीराम कोतवाल' हे नाटक पाहिले आहे काय ? कसे वाटले ?

उ. : मी घाशीराम कोतवाल पाहिले आहे. मला त्याचे प्रेझेंटेशन आवडले; पण नाना फडणवीसांची बदनामी मान्य नाही.

प्र : तुम्ही या नाटकावर बंदी घालण्याची शिफारस कराल का ?

उ. : होय. अशी नाटके दाखवू नयेत असे मला वाटते.

प्र : तुमच्या पनवेल कॉलेजशी अगदी जवळचा संबंध आहे असे ऐकतो.

उ. : मी पनवेलकर असल्यामुळे त्या गावाशी माझा जवळचा संबंध आहे. त्या कॉलेजशी माझा अगदी सुरुवातीपासून संबंध आहे. रयत शिक्षण संस्था ही बाहेरची संस्था कॉलेज सुरू करीत आहे म्हणून आरंभी काहीजणांचा विरोध होता. मी सांगितले की, आतापर्यंत कोणीच पुढे आले नाही. ही संस्था पुढे येत आहे, ती बाहेरची आहे म्हणून तिला विरोध करू नका. आपल्या गावात कॉलेज हवे आहे. मी अनेक मुख्यमंत्र्यांना, मंत्र्यांना, कलावंतांना बोलवून मुंबईत संस्थेसाठी कार्यक्रम केले दरवर्षी मुंबईत कार्यक्रम करून बराच निधी कॉलेजसाठी गोळा करण्यास मदत केली. कॉलेजसाठी माझ्याकडून होईल तितकी मदत आतापर्यंत केली व यापुढेही करणार आहे!

प्र. : महाराष्ट्र सरकारने आपल्याला मुदतवाढ दिली नाही. वाढ मिळावी अशी अनेकांची इच्छा होती. आपल्याला काय वाटते ?

उ. : सरकारने घेतलेला निर्णय योग्यच आहे. अहो, मी तब्बल ३७ वर्षे नोकरी केली. आणखी मुदतवाढ किती मिळाली असती ? सहा महिने, फार तर वर्षभर. त्या मुदतीत मी असे काय करणार होतो ? मला जे काही करावयाचे होते ते मी या दीर्घ मुदतीत केले आहे. आणखी वर्षे कशासाठी ? मी माझ्या ह्यातीत, कारकीर्दीत अनेकांना तयार केले आहे. ती माणसे ही धुरा वाहण्यास समर्थ आहेत. मी आणखी काही काळ त्या जागेवर राहणे म्हणजे माझ्या मागच्या लोकाची प्रमोशन्स थांबविणे असे आहे, हे मला पटत नाही. त्यांना संधी मिळाली पाहिजे. कोणीही, कोणत्याही क्षेत्रात Indispensible नसतो. मला मुदतवाढ मिळाली नाही याबद्दल अजिबात वाईट वाटत नाही.

प्र. : पुढे काय ? एखाद्या खाजगी कंपनीत नोकरी करणार काय? लेखन करायचा विचार आहे काय ? व्याख्यानाचे दौरे आखणार काय ? आर्थिक अडचणी आहेत काय ? आता कसे वाटते ?

उ. : मला मिळणारे पेन्शन व प्रॉव्हिडंट फंडाची रक्कम मला पुरेशी आहे, तशी पैशाची अडचण नाही. यापुढे कोणाचाही नोकर म्हणून रहायचे नाही. मला कामगार-मालक संबंधात रस आहे. तशा तंटयात मी यशस्वीपणे काम केले आहे. तशी जबाबदारी सोपविली तर ते काम करीनही. पण नोकरी म्हणून ते काम स्वीकारणार नाही. अजून तरी अनुभवांवर आधारीत लेखन करण्याचा विचार केला नाही. बोलावणे आले तर व्याख्यानाला जाईन, पण दौरे वगैरे आखणार नाही. पैसे मिळविण्यासाठी लेखन करणार नाही किंवा व्याख्याने देणार नाही. माझ्या सुदैवाने प्रपंचाचा कारभार समर्थपणे सांभाळणारी, मला साथ देणारी पत्नी स्नेहलता मिळाली, मुलगा व मुली हुशार व कर्तबगार आहेत मी पूर्ण समाधानी आहे. आज अगदी मोकळे मोकळे वाटत आहे माझी कोणाबद्दलही तक्रार नाही. माझ्या वाटयाला आलेले आयुष्य मी चांगल्या तऱ्हेने घालविले आहे, माझी नोकरी समाजाच्या भल्यासाठी आहे ही जाणीव ठेवून मी वागलो आहे. मी तृप्त आहे. कृतज्ञ आहे! □


"Start where You are,
With what You have.
Make Something of it
Never be satisfied."

–G. W. Carver

गेल्या वर्षीच्या माणूस दिवाळी अंकात आलेली–गाजलेली चरित्र कहाणी

# एक होता कार्व्हर

लेखिका : सौ. वीणा गवाणकर

पुस्तकरूपात प्रसिद्ध झाली.

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

कथा

# फाइन फ्रेन्झी

मोहन खडसे

ह्या भागातील बहुतेक रस्ते उबाडसाबड आहेत.

हासुद्धा एक डांबरी रस्ता; पण तेवढा उबाडसाबड नाही म्हातारी आकृति त्यावरून जात आहे. साले ! हे बैलगाड्यावाले आपल्या गाड्या इतक्या जोराने हाकतात की रस्त्याचे रस्ते तर राहतच नाहीत अन् त्यात पाऊस. मग काय, एकदम घाणीतल्या चुन्यासारखं बनतं हुबेहुब. अन् ह्या रस्त्यावर जाणाऱ्या बहुतेक एस. टी. गाड्या झिंगतच जातात. कोण जाणे, ती नीट नसते की ड्रायव्हर जास्त पितो. म्हाताऱ्याला फिरायची हौस मोठी, पण भीतीसुद्धा अशा एस. टी. ची. तो आपला ओझं वाहून घेतल्यासारखा चालत आहे. मध्येच बडबडणं. हट करून हात झटकणं. नाही तर खो खो करून मोठ्यानं हसणं. सारंच विचित्रपणे सुरू. मागून येणारी एस. टी. शेफारली म्हाताऱ्याला पाहून. तिच्यात चावटपणा संचारला. म्हाताऱ्याला चाटूनच गेली. काय होतं हे कळण्याच्या आत ती पळालीसुद्धा दूर ! मात्र त्यातून एक थोबाड डोकावलंच. म्हाताऱ्याला बाय-बाय करू लागला. विचारात बुचकळ्या खात असलेला म्हातारा रागाने लालबुद झाला. पिसाळला, थांबला. आपला कपडा कसा काय आहे हे पाहण्यासाठी त्याने नजर फिरविली. सर्वत्र शेणाचे डाग !तो भेसूर मुद्रेने पाहत शिव्या पाठ करू लागला. भाडखाऊ ! माजलेत !! मस्तीत आहेत !!!

पुन्हा आपल्याच नादात. आकाशात नजर टाकली. पुन्हा खाली. काय झालं ? म्हाताऱ्याचा चेहरा खुलला. म्हातारा आता शुद्धीवरच नव्हता जणू. आपलं कसं तरी दिशाहीन. रस्त्याच्या डावीकडून पूर्णपणे उजवीकडे जायचा. ट्रक किंचाळायचा तेव्हा प्रकाश पडायचा.

पुन्हा डावीकडे. पुन्हा उजवीकडे—सारखं सुरूच. म्हातारा एका कालव्याजवळ येऊन ठेपला. कालवा लहानसाच; पण म्हातारी नजर त्यावर टिकाव धरू शकली नाही. घिरघिरू लागली. संथपणे डोलत असलेल्या शेजारच्या शेतामधील कणसावर फिरू लागली नाइलाजास्तव.

मोठी कणसे । लहान कणसे । दाणेदार कणसे । बिनदाण्याचीकणसे । ठसठसीत भरलेली कणसे । कणसेच कणसे । अनेक कणसे.

हे सारं म्हातारी नजर पाहते. एक बैलगाडी आली मालकासोबत भरपूर पाणी पाहून सरसावली. खूप पाणी प्याली. निघून गेली. कणसांना पाहून म्हातारा कविता आठवू लागला.

मधी वावरता आंबा । चारी मेरीनं कणसं ।
डेबुजीच्या कीर्तनात । जसे डोलती माणसं.

पण नेमक्या कवीचं नाव आठवलं नाही. एकटा म्हातारा गुंगीत होता. एक कारटं नजरेस पडलं, जवळपास पंचवीस गुरे चारत असावा. म्हाताऱ्याचा अंदाज. मुलगा पाणी पिण्यासाठी कालव्याजवळ आला. विशिष्ट प्रकारे काठी हलवीत त्याने भुईला टेकविलीआडवी. खाली वाकला. पाणी पिताना मुलाला जाणवलं— त्याचे हात जाड झालेत. निर्जीव म्हशीच्या पखालीसारखे. कष्टाची कामं. थंडपणा काळजाला चिरा देऊन गेला.

¤

पाणी साथ द्यायला तयार नव्हतं. ते भराभर धावत धावत सुटलं. धावतं पाणी गुराची आठवण करून देत होतं. तो निघाला —काळजीनेच. मात्र तोपर्यंत गुरांनी शेतात प्रवेश केलेला होता, त्याच्या तोडचं पाणी पळालं. राखण्या गुरं पकडणार ह्याची कल्पनाच त्याला सहन झाली नाही. राखण्याला चुकवायचं होतं, असंभव संभव करायचं होतं. मात्र गुरं राखण्याने पकडलीतच. राखण्याचा उमंट चेहरा समोर आला. विकट हास्य झालं.

'भडव्या !' राखण्या किंचाळला.जणू वीज कडाडली—आकाशाला छेदत. पाच बोटं त्या कोवळ्या चेहऱ्यावर कोरलीत. तेव्हा राखण्याला वाटलं—अजून तीन-चार बोटं असती तर !

स्वत.ला जमीनदार असल्याची जाणीव करून दिली त्याने. का? त्याला कुणी जमीनदार म्हणत नव्हतं ? त्याला तुच्छ वागणूक दिली ? वेडा झाला ? म्हातारा ? का ? का ?? का ??? तसं नाही ! मग ?

आम्हाला अत्याचार केल्याशिवाय स्वतःची जातच कळत नाही.

¤

म्हातारा मात्र हे पाहून सुन्न झाला. त्याच्या समोरून एक डोमकावळा उगाच आपला मधुर स्वर काढत गेला. म्हाताऱ्याला दया आली अन् रागही. त्यानं भूतकाळात प्रवेश केला. कुठं तरी जुळत आहे असं सारखं वाटू लागलं. धागा सापडला. पण श्रीमंत माणसाला गरिबीची कल्पना, आठवण करणं योग्य वाटतच नाही. आठवलं ! आठवलं !! इतिहास आपली पानं फडफडू लागला.

¤

असाच प्रसंग झाला होता त्याच्याशी. बाप प्लेगला बळी गेला. आई कशी असते कळलंच नव्हतं. म्हातारी आजी आली तेवढी सोबतीला समजायला लागल्यापासून. एका रात्री डोक्याला त्रास देत बसला होता. विचार खालचे वर झालेत. भेसळ झाली. म्हणजे काय झालं ? अशी भेसळ का होत असेल ? नेमक्या महत्त्वाच्या क्षणी अक्कल ढिली का पडते ? बेअक्कलपणा अंगभर संचारतो, असे अनेक प्रश्न का निर्माण होतात हेही कळत नाही. त्याचा डोळा लागला. गुंगी आली होतीच. चंद्र मोकाट सुटला. एक प्रेत मेल्यागत झालं. दोन मुडदे चंद्रात न्हावून निघालेत. भयाणता जिवाचा वेध घेण्यास उत्सुक होती. एक कुत्रं लांबलचक आरोळी ठोकून गेलं. शांतता विरून टाकली. एकदम अलगद. त्यालासुद्धा आपण काहीतरी विशेष केल्यासारखं वाटलं. माणसं लुळीपांगळी व्हावीत असं वातावरण होतं. रात्र ढासळली. सकाळ झाली.

आता आपण काही तरी नवीन करावं. म्हणजे नेमकं काय करावं ? कळत नव्हतं. त्याने पहिल्या ठिकाणचं गुरं राखण्याचं काम सोडलं. दुसरीकडे घेतलं. एक गुलामी सोडली,, नवीन घेतली. चला, नवीन तरी मिळाली. तेवढंच समाधान. स्वातंत्र्याला आळणीपणाची सोबत. दिल के राजा. काहीही करा. म्हणून हे करून ठेवलं. पुन्हा गेला गुराच्याच पाठीमागं. त्यानं सूर्याकडे पाहिलं. त्यानं पाणी पिण्याचा इशारा केला.

पाणी पिण्यास ओढ्यावर गेला अन् पाणी पिऊन आल्यावर पुन्हा तोच गडगडाट......

आज परमेश्वराची बाब खोटी ठरली. राखण्या मध्ये आलाच नव्हता. बिनआत्म्याचा पुतळा. परमेश्वराचा अंशच नसलेला जिवंत माणूस. हे शक्य आहे अजूनही......

¤

म्हातारा आठवणी चिवडत बसला होता. मग त्याच्याच लक्षात आलं की आपण मानसिक घाण करून ठेवली म्हणून. एखादा तंतोतंत जुळणारा प्रसंग का व्हावा? की 'त्याला' आपल्या भूतकाळाची आठवण करून द्यायची असेल! 'तो' आपल्या सुखांना पाहून जळत तर नसेल? साऱ्या जगाचा कारभार सांभाळत असताना राग आपल्यावरच? असं दुखवून? का म्हणून?

बिचारा म्हातारा। चिडचिडे म्हातारे। मूर्ख म्हातारे। संशयी म्हातारे। बेअक्कल म्हातारेच म्हातारे। खूपखूप म्हातारे.

अंधार पडावयास सुरुवात झाली होती.

म्हातारा झाडांना पाहून हादरू लागला. पाणावलेले दोन खड्डे पुसलेत. मात्र परतीहून येणाऱ्या त्याच एस. टी. ला दिसला. चावटपणा पुन्हा संचारला तिच्यात. प्रखर प्रकाशाबरोबर ती किंचाळली. अगदी स्पर्शूनच गेली. म्हातारा पुन्हा दचकला. चरफडला. लालबुंद झाला. एस. टी. पाठमोरी पाहत निघून गेली. लाल डोळे मारत. म्हातारा अंधारातून निसटू लागला, संपूर्णपणे संतप्त अन् अविचारी बनून.

म्हातारा ह्या दिवसापासुन कसा तरीच वागू लागला. अगदी हाफम्याडसारखा. 'जेवण करून घ्या' म्हटलं तर उत्तर देतो 'अगोदर स्वयंपाक करून पाहा.' रस्त्याने स्त्री दिसली की ओरडतो, 'स्त्रियांनो, तुम्ही काहीही करा पण तुम्ही नं, हो तुम्हीच, पुरुष होऊच शकत नाही,' अन् मोठ्याने खो खो करून हसतो. भांडवलशाहीबद्दल त्याने नित्याने बोंबा मारणं सुरू केलं. कुणी ओळखीचा दिसला की झाला सुरू, 'काही नाही मिस्टर ह्या जीवनात. सर्व काही पैशात आहे. माणसानं काहीही करावं.आत्महत्यासुद्धा, पण दुसऱ्याची चाकरी? करूच नये. तडफडत मरावं एकट्यानेच कुठेतरी. पण दुसऱ्याची चाकरी......नको!!! ......'

□

# पुस्तके

## सय

" पारगावकरांच्या आजवरच्या ललित लिखाणात हे पुस्तक मानबिंदू ठरावे. "...**अनिल जी. रानडे**

**श्री.** वि. शं. पारगावकरांचे, 'अस्मिता प्रकाशन, पुणे' ह्यांनी प्रसिद्ध केलेले 'सय' हे अगदी ताजे पुस्तक. यामध्ये पारगावकरांनी लिहिलेल्या वीस ललित लेखांचा संग्रह आहे.

गेली उणीपुरी तीस वर्ष पारगावकर मराठीत लिहीत आहेत. लघुकथा, कादंबरी, राजकीय लेख अशा स्वरूपाचे त्यांनी विपुल लिखाण केलेले आहे. त्यांची पहिली कथा 'बापूची वहिनी' सत्यकथेतून प्रसिद्ध झाल्यावर लगेचंच त्यांनी जाणत्या सुरसिक वाचकांचे लक्ष वेधून घेतले. 'मोर,' 'पितर जेवायला येतात,' 'बेट,' 'तिळा,'सारख्या त्यांच्या कितीएक कथा आजही आवर्जून आठवतात.

'शेवगा वेडा झाला', 'कालचक्र', 'अंतरिता' ह्या त्यांच्या कादंबऱ्या त्यातील अंगीभूत प्रतिभागुणांमुळे, त्यातील कलात्मकतेमुळे मनाला भिडलेल्या आहेत.

पारगाकरांचे लहानपण मराठवाड्यातील बीड जिल्ह्याच्या आसमंतात गेले आहे. ह्या वातावरणाने पारगावकरांच्या संस्कारक्षम मनावर कायमचा ठसा उमटविलेला आहे. पारगावकरांच्या एकूण वाङ्‌मयीन व्यक्तिमत्त्वाशी ह्या परिसराचे एक अतूट नाते जडलेले आहे. त्या वातावरणाचे, त्यातील परिसराचे, सामाजिक संस्थांचे, व्यक्तींचे, वास्तूंचे ललितसुंदर चित्रण पारगावकरांनी 'सय'मध्ये केलेले आहे, हे चित्रण अत्यंत तरल, सूक्ष्म, नाजूक, चित्रमय आविष्काररूप घेऊन आपल्या डोळ्यांसमोर उलगडत जाते. 'पाणवठा', 'पाऊस' ह्यासारख्या काही लेखातील चित्र तर इतके प्रत्ययकारी वठलेले आहे की, सत्यजित राय ह्यांच्या चित्रातल्या चौकटीच आपण पाहात आहोत असे वाटावे. ही त्यांची चित्रे सजग होताना बरोबरचे सगळे ध्वनी सांगाती घेऊन सजग होतात.

'सय' म्हणजे आठवण. जुन्या भूतकाळाची आठवण. आपल्या पूर्वायुष्याची आठवण. पूर्वायुष्यातील मूल्यांविषयीची आपुलकी.बदलत्या काळाबरोबर ही सामाजिक मूल्येही बदलत असतात. गेल्या तीन-चार दशकात तर हे सामाजिक बदल इतके आमूलाग्र झालेले आहेत, इतक्या प्रचंड प्रपाती प्रवेगाने झालेले आहेत की, सर्वसामान्यपणे कोणालाही हे बदललेले सामाजिक वातावरण संपूर्णपणे अपरिचित वाटावे, त्याबद्दल स्वाभाविक दुरावा वाटावा आणि मनाने सुपरिचित भूतकाळातच रमून जाण्याची कांक्षा धरावी. हे असे झाले म्हणजे मग एरवी चांगल्या असलेल्या ललित लिखाणाचे कालसंदर्भ सुटतात आणि मग ते लिखाण म्हाताऱ्या आजीच्या कहाण्यांसारखे होते. सुदैवाने पारगावकरांचे तसे झालेले नाही. म्हणजे त्यांना गतकालीन स्मृतींविषयी आकर्षण जरूर आहे; पण त्याचबरोबर कालाच्या प्रवाहात सामाजिक परिस्थितीत बदल होणे अपरिहार्य आहे, सामाजिक मूल्ये बदलणे अपरिहार्य आहे, ह्याचेही त्यांना जरूर ते भान आहे. त्यामुळे 'आमच्या वेळी' 'आमच्या लहानपणी,' असल्या चालीवर गाणी म्हणत ते कांगावखोरी करत बसत

नाहीत.

ह्या पुस्तकातील सर्वच लेखांची पार्श्वभूमी *ग्रामीण परिसराची आहे; पण म्हणून* हृया पुस्तकावर 'ग्रामीण' म्हणून शिक्का मारून मोकळे होणे मला पसंत नाही. कारण तसा शिक्का मारल्यावर मग त्या पुस्तकावर कलात्मक असण्याचे बंधन राहतेच असे नाही. पण सबंध पुस्तकात एखादे-दुसरे अपवादात्मक ठिकाण सोडले तर पारगावकराचा कलात्मकतेविषयीचा समतोल कोठेही सुटलेला नाही, हे मुद्दाम नोंदवावेसे वाटते.

'सय' संबंधी विचार करताना श्रीनिवास विनायक कुलकर्णी हृयांच्या 'डोहा' संबंधी विचार मनात येणे साहजिकच आहे, इतर अनेक किरकोळ भेदांशिवाय मला एका विशेष फरकाचा इथे उल्लेख करावयाचा आहे. 'डोह'मधील 'मी' हा *संपूर्णपणे ब्राह्मणी* मध्यमवर्गीय सास्कृतिक कोषात गुरफुटून गेलेला आहे. त्यामानाने 'सय'मधला 'मी' हा अधिक चौफेरपणे समाजाभिमुख आहे. (अर्थात् कलात्मक गुणवत्तेच्या दृष्टीने हे असेच असायला हवे असे मी मुळीच मानीत नाही.) त्यामध्ये ब्राह्मण, मुसलमान, महार, पाटील आहेत. काही सुरेख लँडस्केप्स निसर्गदृश्ये आहेत. सामाजिक रूढी, संस्कार यानी जखडलेली माणसं आहेत. गढी, बुरूज अशा वास्तु आहेत. काही विक्षिप्त माणसं आहेत. सारं काही आहे.

खेड्यातल्या दलित समाजावर शतकानुशतके केल्या गेलेल्या अन्यायाला अगदी आता आता वाङ्‌मयातून वाचा फुटू लागलेली आहे पारगावकरानी 'सय'मध्ये अशा तऱ्हेची चित्रं काढलेली आहेत. त्यात कुठेही ऊरबडवेपणा नाही. त्यामुळे ती थेट मनाला जाऊन भिडतात.

'भजन'मधली जख्ख म्हातारी धुरा महारीण अंगण झाडत असते. 'तिच्या हाताची काटकी आणि हातातला खराटा यात काहीच फरक जाणवत नव्हता... तिचे डोळे इतके स्थिर होते की मुखवटयाला बसवतात तसे ते दिसत होते. त्यांच्यातून प्रवाह प्रवाह जाणवतच नव्हता.' अशी ही धुरा महारीण आपले काम संपल्यावर 'तशीच वाकल्या कमरेनं दारात उभी राहिली. थोड्या वेळानं *आत्या बाहेर आली आणि* तिनं शिळ्या भाकरीच्या तुकड्याचा ढीग तिच्या पदरात टाकला. मग एक एक पाऊल मोजकं टाकीत धुरा वाड्याबाहेर पडली...'

'...*काकाच्या बैठकीवर नेहमीप्रमाणे* कामाचा खल चालला होता. दूरवरून कुठून तरी बऱ्याच लोकाचा रडण्याचा आवाज येऊ लागला. मी लुडबूड करीत *आत्याकडे* गेलो. मी तिला मधेच थांबवून विचारलं,

'एवढा मोठ्यानं कोण रडतंय? कुठून आवाज येतो?'

'महारवाड्यातून. धुरा महारीण एकाएकी मेली!'

'आणि मग शांतपणे, मुक्यानं, कुठलाही विरोध–प्रतिकार न करता निमूटपणे या *जगातून गेलेली धुरा, तिच्या असंख्य सुर*कुत्याना, थरथरणाऱ्या हाताना, लटपटणाऱ्या पायांना वाचेचे असंख्य धुमारे फुटले आणि *त्यानी 'मला' वेढून टाकलं मयतीसाठी पैसे* मागायला आलेल्या राणू महाराला काकानी अनिच्छेनं पैसे दिले. काकाच्या चेहऱ्यावर पसरलेली अनिच्छा कंदिलाच्या हेलकावणाऱ्या उजेडात किळसवाणी दिसली. राणू पैसे हातात पडल्यावर पाय न वाजवता हळूहळू वाड्याबाहेर पडला.

'चावडीत टाळमृदुगाच्या नादात भजन चालू होते. एकीकडे दूरवर महारवाड्यातील ओरडा आणि दुसरीकडे भजन, बाकी सारा गाव चिडीचूप झोपला होता. संस्कृतीच्या कुशीत, परंपरेचे पाघरूण घेऊन.

'धुराची प्रेतयात्रा झोपलेल्या गावाची सीमा ओलाडून ओढ्याच्या काठी गेली. भजन चालू होतं. *स्वतःच्या मुक्तीसाठी टाळवृंदाचा* गजर करणारी ती माणसं फक्त जागी होती. बाकी सारं चूपचाप होतं.'

हे जसं धुरा महाराणीचं तसं 'माळावरचा आंबा' मधल्या नामा महाराचं. वाटा ठरवून घेऊन माळावरच्या आंब्याची राखण करण्याचं काम नामा पत्करतो. पाटलानं लादलेला जरबेचा एकांतवास आपणच खुशीनं पत्करलाय असं तो स्वतःला समजावतो. त्याची सून सागुती शिजवून आणते. तो विचारतो,

'कोन मेलं गं आज?'

'कुलकर्णी आनाचा काजळ्या बैल...'

'बैलाच्या आठवणीनं नामाला भरून येतं. *खाणं जात नाही.*

मग एकाएकी वादळी पाऊस येतो. वरून बदावदा आबे मारतात. त्या मारानं नाम मरून जातो.

*हापूसच्या आंब्याखाली त्याचा राखणदार* चौथाईच्या कैऱ्या उशा-पायथ्याशी घेऊन निपचीत पडला होता...'

पारगावकराचे सामाजिक भाष्य (Social comment) हे भाष्य म्हणून बटबटीतपणे कुठे खुपत नाही. गावात कोणा धनवंताकडलं जनावर मेल्याशिवाय महाराना सागुती खायला मिळत नाही हे सत्य, ही वस्तुस्थिती इतर निवेदनाचे अंगच होऊन येते.

गावातली मुलं जगत नसतात. एक कुडमुड्या जोशी गावात येऊन सांगतो, 'गाव उघडा–बोडका आहे. *त्याच्यावर छाया* पाहिजे. गावाला एक बुरूज बाधा आणि त्याच्या पायाला पाच अर्भकं बळी द्या! गाव वाचेल. नंतर एकही मूल दगावणार नाही!'

नाही तरी मुलं आपल्या मरणानं मरतच होती. गावाच्या भल्यासाठी पाच मुलं मारली तर असं काय मोठसं घडणार होतं? मग डोळ्यावर कातडं ओढून हे काम बजावलं. मरणाला टेकलेली मुलं मरणाआधी बुरुजाखाली गाडली गेली!

बुरूज वर चढू लागला तशी गावात मुलं रागू लागली...करता करता लेकुराची संख्या गावात उदंड झाली. ती गावभर उंडारू लागली.

काळ वाहातच होता. बायका हळूहळू बुरजाची माती चोरून नेऊ लागल्या. आधी चोरून मग उजागऱ्या. बुरूज खालून बराच पोखरला गेला होता. त्यात एका हस्ताच्या दणक्या पावसात तो बुरूज खाली ढासळला.

आता त्या फुटक्या बुरुजावर सरकारी अक्षरं आहेत, 'दोन अथवा तीन पुरेत...'

हा झाला 'बुरुज.' खेड्यातल्या विधवेचे जीवन 'उमा' मध्ये आहे. ती तर एक उत्तम लघुकथाच म्हणावी इतकी सरस वठली आहे.

'गढी', 'मशीद', गाव, 'मावशी', ह्या सर्वांवरच विस्ताराने लिहायला हवे, पण ते इथं शक्य नाही. त्यासाठी हे पुस्तक मुळातूनच वाचायला हवे.

पारगावकराच्या आजवरच्या ललित लिखाणात हे पुस्तक मानबिंदू ठरावे. इतकेच *नाही तर मराठीतील लिखाणाचेच एक* लेणे ठरावे इतके ते देखणे आहे. □

फिनिक्स निवड

# The White House Years

By Henry Kissinger (W & N & Micheal Joseph,
Page 1521 Rs. 285/- )

हे पुस्तक फिनिक्समध्ये ११-६-१९८० रोजी दाखल झाले आहे.

बुट पॉलीश करणारे पॅट्रिक मॉयनिहान मोठ्या पदावर पोहोचतात. India has nothing to export except communicable diseases हे वाक्य बहुतेक हेच म्हणाले होते. हे अमेरिकन राजदूत फारच विक्षिप्त कॉमेन्ट्स् करतात. गॅलब्रेथनी 'ॲम्बॅसॅडर्स जर्नल 'मध्ये लिहिले आहे, The more underdeveloped the country, the more overdeveloped the women ! "

माणूस अगदी गरिबीमधून अती श्रीमंत झाला की इंग्रजीत त्याला एक म्हण लागू पडते. From rags to riches story. भीकपतीपासून लखपती. हेन्री किसिंजर लहानपणी एका ब्रशफॅक्टरीमध्ये निरोप देणारा पोऱ्या (Messenger boy) म्हणून काम करीत असत. त्याच्या आयुष्याची कथा म्हणजे From rags to great status and power. स्टेटस व पॉवर आली का पैसे आलेच !

हेन्री किसिंजर हे अत्यंत तल्लख व कुशाग्र बुद्धीचे असामी आहेत त्याचा विनोदही बोचरा असतो. ते नं. १ चे war-monger ही आहेत. म्हणून तर त्यांना स्वीडिश ॲकॅडमीने १९७३ मध्ये शांततेसाठी नोबेल प्राईझ् दिले होते !

थोडेसे बुटके (अमेरिकेच्या दर्जानुसार) व स्थूल देहाचे किसिंजर हातात ब्रीफकेस घेऊन विमानाची शिडी चढून 'निगोशिएशन्स ' साठी निघाले की, व्ही. के. कृष्णमेननची आठवण येते. I am flying to New York. Shall be back day after tomorrow वगैरे जगात पायलट व हवाईसुंदरी सोडून कुणी जास्त प्रवास केला असेल तर तो किसिंजर यांनी !

एखादा राजा किंवा शहेनशहा येण्याच्या आधी 'बा होशियार, बा मुलाहिजा ' अशी ललकारी पडते. हे पुस्तक येण्याच्या आधी सुद्धा असेच झाले. जगाच्या कित्येक मासिकांतून त्यातील उतारे उद्धृत केले गेले. कित्येक परीक्षणे आली. संसदेमध्ये सुद्धा या पुस्तकाविषयी चर्चा झाली. किसिंजरने हे पुस्तक दुसऱ्याकडून लिहवून घेतले अशाही अफवा उठल्या इंग्रजीखेरीज इतर १७ भाषांत ते प्रसिद्ध होणार आहे असेही ऐकले. भविष्यात जगातील शेकडो किंवा हजारो नियतकालिकांत या पुस्तकातील उतारे उद्धृत केले जातील असेही वाचले. या पुस्तकात कित्येक नामांकित नेत्यांची चित्रणे असतील असेही कानांवर आले. परदेशी धोरणाच्या विद्यार्थ्यांनी हे पुस्तक वाचावेच असा एक दंडक (अमेरिकेत ?) निघेल असे एकदा टाइम मासिकात आले होते.अशा थाटात या दीड हजार पानी ग्रंथसाहेबाचे आगमन झाले. ज्या कालखंडात अमेरिकेच्या इतिहासात अनेक उलथापालथी झाल्या तो पुरा कालखंडच किसिंजरनी पालथा केला आहे.

बा होशियार...बा मुलाहिजा वगैरे अलाहिदा; पण मला जे. के. गॅलब्रेथचे 'ॲम्बॅसॅडर्स जर्नल' जेवढे वाचनीय वाटले तेवढे हे पुस्तक वाटले नाही. फार काय, माझ्या ग्रंथालयात निक्सन यांच्या आठवणीचे जे पुस्तक दाखल झाले आहे ते सुद्धा या पुस्तकापेक्षा अधिक वाचनीय आहे. (निक्सनचे पुस्तकही एकदा 'फिनिक्स निवड ' या सदरात येणार आहे.)

सबंध पुस्तकात किसिंजर एक आटोपशीर टिपरीचा खेळ अति कौशल्याने खेळत आहेत असे वाटते. कधीही औट न होता ! किसिंजर यानी अमेरिकन लालफितीचा नेहमीच अवमान केलेला आहे. निक्सन यांचे जणू ते आश्रयदाते होते असेच नेहमी ते त्यांच्याशी वागत ! माओ व द गॉलबद्दल किसिंजरना फार आदर असे; पण एकदा का एखाद्याचे वाभाडे काढायला लागले की, मग त्या व्यक्तीची पद्धतशीर लक्तरे निघालीच !

एखादा विषय या हार्वर्डच्या प्रोफेसरानी हाताळायला घेतला की, ते थेट गाभाऱ्यापाशी जात. किसिंजर यांच्या ठायी एकाग्रतेची शक्ती प्रचंड आहे. त्याची अहंताही तेवढीच पहाडी आहे.

हे सर्व ठीक; पण किसिंजर यांच्या अनेक धोरणांमुळे युद्धे पेटली आहेत. जगाच्या पाठीवरच्या कितीशा लोकांचे रहाणीमान किसिंजरच्या धोरणामुळे सुधारले आहे ? ते कर नाहीच; पण, 'किसिंजरच्या धोरणामुळे अनेक लोक मृत्युमुखी पडले आहेत. असे म्हणतात की चिलीच्या साल्वाडोर ॲलेन्डेचा खून किसिंजर यानी CIA तर्फे करवला. खुन्याला नोबेल प्राईझ् ? What next, for God's sake ! या जगातील जीवघेण्या स्पर्धेच्या शर्यतीत भाग घेणाऱ्यांना किसिंजरचा रोल स्मार्ट वाटेल; पण शेवटी जगाच्या तळाशी असलेल्या लोकांना ज्यांचा उपयोग होतो तेच खरे नोबेलपारितोषिकासाठी पात्र असावे. किसिंजर याना नोबेल-पुरस्कार देऊन स्वीडिश ॲकॅडमीने नोबेल प्राईझ्चा सर्व 'चार्म 'च काढून घेतला आहे रजनीशना मदर टेरेसाला नोबेल प्राईझ् दिलेलं आवडलं नाही. मला किसिंजरना दिलेलं आवडलं नाही. चालायचंच—

चिलीमध्ये जेव्हा डॉ. साल्वॉडोर ॲलेन्डेचे सरकार होते त्या वेळेला सी. आय. ए. ने ज्या डर्टी ट्रिक्स केल्या त्यात किसिंजरचा वाटा फार मोठा होता असे म्हणतात. या किसिंजरच्या वाटयामुळे कैक सिनेटर्स विटले होते.

आमच्या ग्रंथालयात किसिंजरवर आणखी दोन पुस्तके आहेत. एम्. व्ही. कामतांचे Kissinger. The Incomplete Diplomat व टी. एन. कौलचे Kissinger years : Indo- American Relations. पैकी श्री. कामताचे पुस्तक अधिक चांगले वाटले. याच पुस्तकात किसिंजरचे चिलीबद्दलचे पुढील वाक्य उद्धृत केले आहे. '*I don't see why we need to stand by and watch a country go communist due to irresponsibility of its own people.* '

हार्वर्डच्या प्रा. ची भाषा आटोपशीर व चांगली आहे. या १५०० पानांच्या ग्रंथात त्यांनी कैक विषय हाताळले आहेत. पुष्कळ ठिकाणी भारताविषयी व इंदिरा गांधीविषयी पूर्वग्रहदूषित वृत्तीने उल्लेख केलेला आढळतो. बांगला देशाच्या युद्धाचे वेळी आक्रमण करण्यात भारतानेच पुढाकार घेतला आहे असे

सूचक अर्थाने किसिंजर यांनी या पुस्तकात म्हटले आहे.

किसिंजर यांचे पुस्तक बघून परवा मला एक बाई म्हणाल्या, 'माणूस' मध्ये माधुरी भिडे एकदा म्हणाल्या होत्या की, किसिंजर-सारख्या माणसाने तिच्यावर प्रेम केले तर ती ढगातच जाईल; पण माझ्यासारख्या बाईवर प्रेम केले तर मी पाताळातच रौरव नरकातच जाईन. काय पण अमेरिकेची हवा, बघा!'

हार्वर्डच्या प्रा. नी या आडदांड ठोकळ्यात व्हिएतनामयुद्ध, डीन अचेसन, कॉनरॅड ॲडनॉवर, साल्वाडोर ॲलेन्डे, जॅक ॲंडरसन, ब्रेझनेव्ह, डॉक्ट्राइन अरब–इस्राइल युद्ध, एल्सवर्थ बंकर, बर्लिन निगोशिएन्स, भारत–पाक युद्ध, चौ एन लाय, एनॅटॉली डॉबिनिन, द गॉल, इंदिरा गांधी, जर्मनी, ग्रॅमिकॉ, रिचर्ड हॅमस, लिंडन जॉन्सन, मॅक्स्विन लेअर्ड वगैरे अनेक कमीअधिक प्रख्यात व्यक्ती व विषयांवर लिहिले आहे. केवळ परराष्ट्रीय धोरणाच्या विद्यार्थ्यांसाठी हे पुस्तक नाही. राजकारण व आंतरराष्ट्रीय राजकारण याबाबतीत मात्र या पुस्तकाला तोड नाही!

कामत यांच्या पुस्तकात श्री. किसिंजर व नॅन्सी मॅगिन्सचा एक फोटो आहे. प्रस्तुत पुस्तकातील फोटो मात्र प्रा. च्या हनुवटी-द्वयासकट सर्वच चागले आहेत. सौ. नॅन्सी किसिंजर या किसिंजर ह्यांच्यापेक्षा ६ ते ८ इंच उंच असतील. तशा सौ. किसिंजर उंच असूनही चार्मिंग दिसतात; पण कामतांच्या या पुस्तकातील त्याचा फोटो बघून succubus ची आठवण येते. अजून तरी succubus ने incubus चा नाश केला नाही.

—जे. एन. पोंडा

---

रंगभूमी

# लव्हबर्डस्

## फुसका फार्स

मुंबईच्या 'चंद्रलेखा' या नाट्यसंस्थेने प्रा. मधुकर तोरडमल लिखित व दिग्दर्शित 'लव्हबर्डस' हे नवे नाटक नुकतेच रंगभूमीवर आणले आहे. हे नाटक 'हास्यरसात मुरवलेले आहे' अशी याची जाहिरात केली गेली; परंतु प्रत्यक्षात मात्र हा हास्यरस अश्लील-तेच्या पाण्यामुळे फारच पातळ झाला आहे.

चंद्रलेखा ही एक मान्यवर संस्था, मधुकर तोरडमल गेली १२–१५ वर्षे नाट्यलेखक, दिग्दर्शक व अभिनेता या भूमिकांतून यशस्वी-पणे संचार करून एक मानाचे स्थान मिळवून बसलेले. त्यामुळे आपण या नाटकाला काही अपेक्षा बाळगून जातो; पण आपला अपेक्षा-भंग झाल्याशिवाय रहात नाही.

सर्वसाधारणपणे 'फार्स' या प्रकारात मोडणाऱ्या नाटकांची रचना ही मजबूत कथा-वस्तूपेक्षाही प्रसंगातून होते. विविध तऱ्हेच्या स्वभावांची पात्रे या प्रसंगातून फिरत राहतात, गडबड, घोटाळे, गुतागुंत वाढते आणि शेवटी त्यांची उकल होऊन शेवट गोड होतो.

परंतु 'लव्हबर्डस' सर्वच बाबतीत उणे पडते—कथा, प्रसंग, संवाद, व्यक्तिरेखा यापैकी काहीच आपल्या मनाची पकड घेऊ शकत नाहीत ही मोठी वाईट गोष्ट आहे.

मिस मीनाक्षी देशपांडे (मेधा वागळे) आणि रवी करंदीकर (चंद्रकांत काळे) हे एक प्रेमी युगुल. लवकरच लग्न करून ससार थाटण्याचा विचार करीत आहे. दोघेही नोकरदार आहेत. तात्पर्य सगळं एकंदरीने ठीक चालू आहे; पण आजकाल काही तरी बिनसलेलं आहे, मीनाक्षीच्या मागे तिचा वृद्ध बॉस हात धुऊन लागला आहे. सारखे फोन, सारखी एका मागोमाग एक प्रेझेंटस काय, अर्थातच मीनाक्षी व रवी या दोघा-मध्ये एक बारकेसे वादळ निर्माण होते. नंतर ही सर्व प्रमुख पात्रे बॉसच्या—तात्यासाहेब साठे याच्या (दीनानाथ टाकळकर) खंडाळ्याच्या बंगल्यावर दाखल होतात. या तीन प्रमुख पात्राच्या जोडीला सौ. सुमन साठे ऊर्फ मॅडम (वैजयंती चिटणीस) मोतीराम मुगी (मोहन मुगी) आणि एक मेडिकल रिप्रेझें-टेटिव (उपेंद्र दाते) ही पण पात्रे हजर असतात; मग थोडासा गोंधळ आणि शेवट गोड.

सगळ्यात प्रकर्षाने जाणवणारी गोष्ट म्हणजे अत्यंत लहानसे कथानक प्रचंड ताणले आहे आणि विनोदनिर्मितीसाठी अश्लील व द्वयर्थी वाक्ये, यांचा सर्रास वापर केला आहे. त्यामुळे विनोद अत्यंत खोल पातळीचा व फुटकळ बनतो— नाटकातले रहस्य लवकर उलगडले जाऊ नये म्हणून योजलेले पात्रांच्या प्रवेशांचे व जाण्याचे प्रसंग कृत्रिम व ओढून ताणून आणलेले जाणवतात. संवाद व पात्राच्या हालचाली याची पुनरावृत्ती तर नाटकभर आहेच, पण ते सर्व शिळे व कंटाळवाणे वाटते त्यामुळे उरते काय तर अश्लील व द्वयर्थी वाक्याना मिळालेले हसे.

त्या विनोदांचे काही नमुने म्हणजे, तात्यासाहेब साठे आणि त्यांच्या पत्नी सुमन साठे याचे 'बागकाम' व 'फावडे' याविषयीचे बोलणे. पुढे (पुढे या 'फावड्या' च्या विनोदाला लोक हसत नाहीत.) मोतीराम मुगी हा सततच्या सर्दीमुळे अनुनासिके उच्चारू शकत नाही, त्यामुळे तो स्वत चे नाव 'बोतीराब बुगी' असे सांगतो आणि त्याचे कारण 'चोदलेले' नाक असे सांगतो. आता यातील अनुस्वार गेल्यावर काय उरते? तसेच तो मुंगी 'र' च्या जागी 'ड' म्हणत असतो. मात्र 'मी तो हमाल भारवाही' याचे काय रूपांतर होत असेल ते सांगावयास नकोच.

याहीपेक्षा कहर प्रसंग म्हणजे, अगदी लहानखुरा उमेदवार व त्याचा धिप्पाड पैलवानी प्रचारक याच्या 'प्रचाराचा' प्रसंग. नाटकाच्या कथेशी कसलाही संबंध या प्रसंगाचा नाही. प्रचारकाच्या कडेवर बसून त्या छोटयाशा उमेदवाराने येणे व इतर काही फुटकळपणा यातून काय विनोद निर्माण होतो ते शेवटपर्यंत समजू शकले नाही. हा प्रसंग विलक्षण खटकतो

या नाटकातले सर्वच अभिनेते चांगलेच मुरब्बी वगैरे आहेत; पण कमकुवत संहितेमुळे व ठिसूळ व्यक्तिरेखांमुळे ते सर्व वाया गेले आहेत दीनानाथ टाकळकराना या वयात अत्यंत बालिश व पोरकट चाळे करताना व हलक्या दर्जाचे संवाद बोलताना पाहून खेद होतो. तीच गोष्ट वैजयंती चिटणीस यांची. मात्र त्या हसतात मोठ्या सुरेख रीतीने.

मीनाक्षी देशपांडेच्या भूमिकेत 'मेधा वागळे शोभून दिसल्या आणि रवी करंदी-करच्या भूमिकेत चंद्रकात काळे छान दिसले, यापुढे काही बोलताच येत नाही; कारण त्यांना अभिनयगुण वगैरे दाखवण्याची काही संधीच नाही. त्या दोघांनीही आपआपली कामे छानच केली; पण श्री. काळे यांच्यासारख्या गुणी नटाला बनियन व अर्ध्या चड्डीत उड्या वगैरे मारताना पाहून काही आनंद होत नाही. एक्स–रे गॉगलचा प्रकारही खूपच ताणला आहे.

हे निराशाजनक नाटक पाहिल्यावर एकच प्रश्न मनात उभा राहतो, तो म्हणजे अगोदर अनेक उत्तम नाटके लिहून, दिग्दर्शित करून झाल्यावर आपण स्वत: निर्माण केलेल्या आपल्या प्रतिमेला आपणच धक्का पोचवण्याची इच्छा प्रा. मधुकर तोरडमल यांना का व्हावी? तीच गोष्ट मोहन वाघ यांच्या-बाबत. हे नाटक 'प्रकाशित' करून 'चंद्रलेखा'च्या कीर्तीत भर पडली काय?

—प्रतिनिधी

चित्रपट

बलात्काराच्या प्रश्नावरचा हिंदी सिनेमा हाही एक बलात्कारच असतो.

# इन्साफ का तराजू

फार वर्षांपूर्वी बी. आर. चोप्रांनी 'साधना'च्या निमित्ताने एका पतितेची कैफियत मांडली होती. त्यातील वेश्या असलेली नायिका, तिला चाहणारा तरुण प्राध्यापक, तिला कोठीत खेचणारा दलाल व अखेर अंबरा ओलांडून घरात घेणारी स्त्री. या साऱ्यांनी पतितेचे पावित्र्य अुजळवले होते.

'ये वो बदकिस्मत माँ है जो बेटोंके रोज़ पे लेटी है' ह्या ओळी गाताना लताच्या आवाजाला जीवघेणा कंप अन् ही साहिरची स्पष्टोक्ती काय काय जिंकून गेली होती. त्रिवाहितेच्या प्रेमाचा 'गुमराह', कुमारी मातेचा 'धूल का फूल' अशी कल्पक अन् समर्पक शीर्षके देणाऱ्या बी. आर. चोप्रांनी मात्र 'इन्साफ का तराजू' असं बटबटीत नाव देऊन स्त्रीच्या आणखी एका ज्वलंत प्रश्नावर, बलात्कारावर बरीच चर्चा घडवून आणली आहे. मात्र दरम्यानच्या काळात बी. आर. साहेबांनी प्रचंड तडजोडी केल्यात. सामाजिक जाणिवेला स्थान देण्याच्या प्रयत्नात बलात्काराचं चलनी नाणं असं चलाखीनं वापरलंय की बस् !

भारती सक्सेना (झीनत अमान) ही स्वरूपसुंदर मॉडेलिंग करणारी तरुणी, तिची छोटी बहीण नीता सक्सेना (पद्मिनी कोल्हापुरें) व भारतीचा प्रियकर अशोक वर्मा (दीपक पाराशर) यांच्या छोट्या परिवारात एक वादळ येतं. भारतीच्या सौंदर्याचा चाहता म्हणून येणारा रमेश गुप्ता (राज बब्बर) हा वाहवलेला लक्ष्मीपुत्र परिचयाच्या पायऱ्या अधिरेपणाने ओलांडतो. मोठी पार्टी, किंमती भेटवस्तू व नंतर एकदा बेसावधपणे सरळ सरळ तिच्यावर घाला घालतो. संध्याकाळी प्रियकराबरोबर होणाऱ्या वाङ्निश्चयाच्या आधीच सर्वस्व संपल्याने कोसळलेली भारती न्यायासाठी कोर्टात जाते. पुराव्याअभावी काहीच सिद्ध न झाल्याने कोर्टातून फक्त बदनामी घेऊन निघते. पुन्हा एकदा दुभंगून प्रियकरापासून, समाजापासून दूर जाते आणि तसंच एक तुफान येतं अन् छोट्या बहिणीवर कोसळतं. अन् मग मात्र न्यायासाठी कोर्टात न जाता ती एक धाडस करते.

बलात्काराचा पुरावा मागणारं न्यायशासन, समाजातल्या जनावरांना पकडू न शकणारे दुबळे कायदे यांचा फार मोठा ऊहापोह कोर्टसीन्सच्या निमित्ताने झालाय.

'कानून' मधले कोर्टसीन्स आठवता मात्र इथले अगदी नाटकी, भडक पण तरीही तडाखेबाज आहेत. कोर्टसीन्समध्ये भाव खाऊन जातात दोन माणसं. एक वकीलसाहिबा सिमी अन् जज्जसाहेब इफ्तीकार ! सिमीचा प्रौढ अभिनिवेश सुंदर आहे. तसाच नुसत्या नजरेने बोलणारा इफ्तेकार. डॉ. लागू मात्र मळलेल्या वाटेवरच चालतात.

बलात्काराच्या घटनेने ढवळणारे स्त्रीजीवन दाखवताना आपल्या फिल्मवाल्यांची चाकोरी सुटत नाही. इतका सूत्र करणारा जबरदस्त विषय असून त्याची Treatment सरधोपट आहे. B. R. फेम कोर्टसीन्स, बागेतली गाणी, झीनत अमान नायिका असल्याने, शिवाय व्यवसायाने मॉडेल असल्याने भरपूर स्वातंत्र्य घेऊन वस्त्रात कपात केली आहे. न्यायदेवतेच्या हातात चक्क तराजूही आहे. कोर्टातल्या पंख्याची भिरभिरती सावली. बाकी B. R. च्या युनिटमधला पेटंट संगीतकार रवि नाही; पण भसाडं शीर्षक गीत गाणारा महेंद्र कपूर आहे. (रवींद्र जैन असून येसुदास नाही !) साहिरच्या सुंदर गजलचा निर्जीव उपयोग आहे. धर्मेंद्रच्या Guest appearance ला व आरंभाच्या फॅशनशोच्या प्रसंगाला चक्क विविध गुणदर्शनाची कळा आलीय.

झीनत अमान दिसते सुंदर; पण बलात्काराच्या घटनेचा गंभीरपणा बिंबवण्याऐवजी कमरेच्या लचक-झटक प्रकाराने प्रेक्षकांना अस्वस्थ करते. तीच गोष्ट पद्मिनी कोल्हापुरेची. तिला शाळकरी म्हणावी तर बहिणीचे व तिच्या प्रियकराचे चाळे बघते अन् 'है जो यही प्यार का ट्रेलर तो पिक्चर क्या होगी' असं वाचरट, निरर्थक गाणं म्हणते. राजपुत्राच्या चुंबनापेक्षाही पुढं जाऊन ही धिटुकली झीनत अमानच्या मार्गावर आहे. दीपक पाराशर सूटिंग्जच्या जाहिरातीतून उठून आल्यासारखा वावरतो. राजबब्बर या देखण्या पण निर्बुद्ध नटाबद्दल काय म्हणावे ? आपल्या मराठी श्रुतिकांतून बोलतात तसे संवाद म्हणतो. शिवाय चेहऱ्यावर सदैव दुसऱ्या पायाखाली नकळत भुईनळे लावल्यानाचा भाव.

सामाजिक जाणिवेने तुम्ही अंतर्मुख व्हावे असा उद्देश तर आपल्या फिल्मवाल्यांचा असतो असे नाही. फार तर बी. आर. सारखे लोक असे एखादे हुकमी एक्के नाचवतात. बलात्काराच्या घटनेचा निःशब्दपणा तुमच्या भोवती राहत नाही. अन्यायाचे भांडवल अन् त्या निमित्ताने गर्दी खेचायला बी. आर. चोप्रांचा पंजाबी चाट मसाला बेमालूम काम करतो. त्यातील वकील सिमी म्हणते, बलात्काराचा खटला हा त्या स्त्रीवर आणखी एक बलात्कार असतो; पण बलात्काराच्या प्रश्नांवरचा हिन्दी सिनेमा हाही एक बलात्कारच असतो. प्रेक्षकांवर ! खरंच भारतीय नारीवरील अन्यायाला इतकी चविष्ट फोडणी आपली फिल्म इंडस्ट्रीवालेच देऊ जाणे !

—सुलभा तेरणीकर

